# खंड 1 : मार्गदर्शक तत्व

## 1.0 अध्याय परिचय

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सांप्रत प्रभावशील असलेल्या घटने (ज्याच्यात संस्थापना प्रलेख आणि समस्त नियमावली चा समावेश आहे ) च्या अन्वये मंडळाच्या कार्यकारिणी चे गठन निवडणूक माध्यमांतून होणे अपेक्षित आहे आणि त्या करिता काही मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश घटनेत केला गेला आहे . ही निवडणूक संहिता ह्याच मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे आणि घटनेत निर्देशित आज्ञे प्रमाणे संकलित व स्थापित करण्यात आली आहे. सुलभ संदर्भा करिता नियमावलीत समाविष्ट मार्गदर्शक तत्त्वांचा पुनरुल्लेख ह्या खंडांत करण्यात आला आहे.

- ह्या खंडात बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी करिता निवडणुकांसाठी नीति निर्देशक आणि मार्गदर्शक नियमांचा आणि प्रक्रियांचा समावेश केला गेला आहे. निवडणुकांशी सम्बंधित विस्तृत नियमावली तसंच कार्यविधि वेगळयाने निवडणूक संहिता (इलेक्शन मैन्युअल) मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी द्वारे प्रकाशित केली जाईल ज्याच्यात संपूर्ण निवडणूक प्रक्रिया आणि कार्यविधि ची क्रमाक्रमाने अंमलबाजावणीच्या व्यवस्थे संबंधी विस्तृत उल्लेख असेल .
- खाली नमूद सर्व नीति निर्देशक आणि मार्गदर्शक नियम व प्रक्रियांचे पालन अनिवार्य असेल.
- महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री बृहन्महाराष्ट्र मंडळाचे पदसिद्ध प्रमुख संरक्षक असतील आणि त्यांना "**प्रमुख आश्रयदाते** " ह्या पदनांवाने संबोधित केले जाईल. हे पद कार्यकारिणीचे सर्वोच्च पद असेल पण पदसिद्ध असल्यामुळे ह्या पदा करिता निवडणुक घेतली जाणार नाही .

**अ.** अध्यक्ष, उपाध्यक्ष, प्रधान कार्यवाह, कार्यवाह, कोषाध्यक्ष, सह कोषाध्यक्ष आणि कार्यवाह(महिला) ह्या सर्व पदांकरिता गुप्त मतदान पद्धति ने निवडणुका होतील. निवडणूक तसंच प्रत्येक विभागा करिता विभागीय कार्यावाह ची निवडणूक संबंधित विभागातील मतदातांद्वारे गुप्त मतदान पद्धती ने होईल.

**आ.** **निवडणूक अधिकारी** : निवडणूक नियोजित असलेल्या सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या सर्वसाधारण सभेत कार्यकारिणी तर्फे प्रस्तावित व्यक्तीस सर्वसाधारण सभे द्वारा सामान्य बहुमताच्या आधारावर निवडणूक अधिकारी नियुक्त केले जाईल. निवडणूक अधिकाऱ्यास बृहन्महाराष्ट्र मंडळाचा सदस्य असणे बंधनकारक राहिल. निवडणूक अधिकाऱ्याची नियुक्ती ची माहिती संस्थेच्या मुखपत्रात प्रकाशित केली जाईल.

**इ.** **उमेदवारी, नामांकन प्रस्ताव, आणि नामांकनाच्या अनुमोदनाचा अधिकार**: शुभचिंतक सभासद श्रेणी चे सभासद वगळता इतर समस्त सभासद श्रेणींचे सभासद जे निवडणूक घोषणा तिथीस सभासद आहेत आणि ज्यांचे बृहन्महाराष्ट्र मंडळा हितार्थ कुठले ही आर्थिक देणे नाहीये, अशे सभासद मतदाता, उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास पात्र असतील. संलग्न संस्थेचे प्रतिनिधि उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास अपात्र असतील. संस्थागत प्रतिनिधींना फक्त मतदानाचा अधिकार असेल. नामांकन प्रस्तावांत उमेदवाराच्या वास्तविक निवास पत्त्या संबंधीची कुठली ही माहिती त्रुटीपूर्ण किंवा चुकीची असल्याचे आढळल्यास उमेदवार, प्रस्तावक, आणि अनुमोदक यांचे सभासदत्व स्वयमेव निरस्त होईल. ह्याची दखल घेवून प्रधान कार्यवाह ह्या संबंधीची माहिती/सूचना मुखपत्रात तसंच इंटरनेट संकेत स्थळावर प्रकाशित आणि प्रसारित करतील. निवडणूका निवडणूक संहिते (इलेक्शन मैन्युअल) प्रमाणेच संपन्न होतील.

**ई.** निवडणुकां करिता निर्धारित तिथीच्या किमान तीन महिन्या पूर्वी निवडणूक अधिकारी द्वारा मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रधान कार्यवाह आणि कोषाध्यक्ष द्वारे स्वतःच्या स्वाक्षरीने सत्यापित केलेली मतदाता सूची प्रकाशित केली जाईल. हीच सूची निवडणूक स्थळावर निवडणूक पूर्वी किमान एक दिवस आधी माहिती फलकावर लाविली जाईल. ह्या सूची वर कोणा ही मताधिकार प्राप्त सदस्यास कुठल्या ही प्रकारचा आक्षेप असल्यास निवडणूक अधिकारी द्वारे घोषित निवडणूक कार्यक्रमा प्रमाणे आपला आक्षेप नोंदविला जाऊ शकतो ज्याचे निरसन निवडणूक अधिकारी द्वारे मतदान प्रारंभ होण्याच्या 16 तास आधी पर्यंतच्या कमाल वेळ मर्यादेत करणे भाग असेल.

**उ.** निवडणूक वर्षात अधिवेशन/ सर्वसाधारण सभेच्या सूचने सोबतच निवडणुकींचा संपूर्ण कार्यक्रम निवडणूक अधिकारीच्या अनुमोदनाने प्रसिद्ध केला जाईल.

ऊ. निवडणुका कार्यकारिणी च्या सतत तीन वर्षाच्या कारकीर्द अवधि साठी घेतल्या जातील आणि समान पदावर लागोपाठ दोन कारकीर्द पूर्ण केलेल्या कुठल्याही पदाधिकाऱ्यास त्याच पदा करिता कमीत कमी एक कार्यकाल अवधी पर्यंत पुन्हा उमेदवारीची पात्रता राहणार नाही.

ए. **निर्वाचन न्यायाधिकरण (ट्रिब्युनल)** : निवडणूक नियोजित असलेल्या सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या सर्वसाधारण सभेत निर्वाचन न्यायाधिकरण (ट्रिब्युनल) चे गठन केले जाईल. ह्या न्यायाधिकरणात तीन आजीवन श्रेणीच्या सभासदांचा समावेश असेल. ह्या न्यायाधिकरणाच्या कुठल्याही सदस्यास उमेदवारी, प्रस्तावक किंवा अनुमोदक असण्याची पात्रता राहणार नाही पण त्यांना मताधिकार वापरण्याची पात्रता राहील. कार्य: निवडणूक अधिकारीच्या कुठल्याही निर्णया विरुद्ध तक्रार ह्या न्यायाधिकरणा समक्ष केली जाऊ शकते. ह्या संबंधात न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि ह्या निर्णय विरुद्ध कुठल्याही न्यालायात अपील स्वीकार्य नसेल. निर्वाचन न्यायाधिकरणास प्राप्त तक्रारींचे निराकरण मतदान प्रारंभ होण्याच्या 12 तास आधी पर्यंतच्या कमाल वेळ मर्यादेत करणे भाग असेल.

ऐ. कार्यकारिणीच्या कारकीर्द अवधीत जर कुठल्याही कारणास्तव कुठले ही पद रिक्त असेल तर पद रिक्त होण्या नंतर प्रथम कार्यकारिणी बैठकीत पद रिक्त असल्याची घोषणा केली जाईल आणि तत्पश्चात पुढील बैठकीत ह्या रिक्त पदांवर कार्यकारिणी द्वारे सामान्य बहुमत किंवा सर्वसंमती आधारे योग्य व्यक्तिंना सह्योजित केले जाईल. अश्या प्रकारे रिक्त पद भरले जाण्या पर्यंत अध्यक्षाच्या रिक्त पदाचा पदभार उपाध्यक्ष द्वारे, प्रधान कार्यवाह च्या रिक्त पदाचा पदभार कार्यवाह द्वारे आणि तसंच कोषाध्याक्षाच्या पदाचा पदभार सहकोषाध्यक्ष द्वारे वहन केला जाईल.

ओ. **संस्थागत सभासदांना मतदानाचा अधिकार**: समस्त संलग्न संस्थांना खालील दोन पैकी कुठल्याही एक विधिने मतदान करण्याची सुविधा राहील :

1. आपल्या नियुक्त प्रतिनिधींच्या माध्यमातून, जे अनिवार्य पणे संलग्न संस्थेच्या निर्वाचित पदाधिकाऱ्यांपैकीच असतील, किंवा
   *(टीप : जर संलग्न संस्थेत निर्वाचनाचे प्रावधान नसेल किंवा काही कारणास्तव निर्वाचित कार्यकारिणी अस्तित्वात नसेल तेंव्हा अश्या परिस्थितीत संस्थेचे प्रभारी अध्यक्ष आणि प्रभारी सचिव प्रतिनिधि म्हणून स्वीकार्य असतील)*
2. प्रातिनिधिक मताच्या (प्रॉक्सी मत) माध्यमातून ज्याच्या अंतर्गत संस्थांना बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कुठल्याही विद्यमान निर्वाचित कार्यकारिणी सदस्याच्या माध्यमातून मतदानाचा अधिकार असेल.

औ. वरील दोन्ही विधी अंतर्गत संस्थांना निवडणूक अधिकारी द्वारे दिले गेलेल्या स्वाक्षरी युक्त परिपत्रावरच आपली मतदान विधी ची निवड आणि अन्य अपेक्षित माहिती निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूक अधिकारी पर्यंत पोहोचवावी लागेल. संलग्न संस्थांना खाली नमूद केल्या प्रमाणे मतदान करण्याची पात्रता असेल:

1. अश्या संस्था ज्यांची सभासद संख्या 25 पेक्षा कमी आहे - 1 मत
2. अश्या संस्था ज्यांची सभासद संख्या 25 किंवा 25 हून अधिक पण 100 हून कमी आहे – 2 मतं
3. अश्या संस्था ज्यांची सभासद संख्या 100 किंवा 100 हून अधिक आहे – 3 मतं

   वरील प्रमाणे मतांची संख्या निर्धारित करण्या करिता सर्व संस्थांची सत्यापित सभासद संख्या आणे सभासदांच्या नाव व पत्त्याची यादी संबंधित संस्थे द्वारा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीस संलग्न संस्थेच्या अध्यक्ष किंवा सचिव द्वारे दिनांक 31 मार्च पर्यंत सूचित करण्यात येईल. निवडणूक अधिकारी मतदाता यादी प्रकाशित करताना मतदाना करिता पात्र असलेल्या सर्व संस्थांची नांवे आणि प्रत्येक संस्थेला पात्रता असलेल्या मतांची संख्या प्रकाशित करतील. मतदाता यादीच्या प्रकाशन उपरान्त यादीत कुठलेही परिवर्तन होऊ घातलेल्या निवडणुकांच्या पश्चातच होतील. पण कुठल्याही परिस्थितीत संस्थेला किमान एक मताची पात्रता अवश्य राहील.

अं. **वैयक्तिक श्रेणीतील सभासदांना मतदानाचा अधिकार**: बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व वैयक्तिक श्रेणीतील सभासदांना मतदान करण्याची पात्रता राहील जे सामान्यतः बृहन्महाराष्ट्रात अर्थात महाराष्ट्र राज्याच्या बाहेर निवास करतात. “शुभचिंतक श्रेणी” च्या सभासदांना मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

अः. **टपाल मतपत्र द्वारे मतदान** : खाली नमूद केलेल्या निकषांना संतुष्ट करणाऱ्या सभासदांना निवडणूक अधिकारी द्वारे मतदात्यास दिलेल्या मतपत्राचा उपयोग करून टपाल द्वारे मतदान करण्याच्या सुविधेचा उपयोग करता येईल. ह्या संदर्भात विस्तृत माहिती आणि निर्देश निवडणूक कार्यक्रमा बरोबरच घोषित केले जातील आणि धोरणात्मक निर्देशांचा समावेश निवडणूक संहितेत केला जाईल:

1. निवडणूक घोषणा तिथिस किमान 75 वर्ष वय पूर्ण केलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील सभासद
2. कुठल्याही प्रकारची दिव्यांगते (विकलांगते) नी ग्रस्त असलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील सभासद

# खंड 2 : निवडणूक प्रक्रिया निर्देश

## 2.0 अध्याय परिचय

प्रस्तुत अध्यायात निवडणुकीतील विविध प्रक्रिया संबंधी विस्तृत वर्णनाचा क्रमवार समावेश करण्यात आलेला आहे . प्रत्येक प्रक्रियेत त्या प्रक्रियेचे विविध घटक, करावयाची कामे आणि विधी या संबंधी तपशीलवार माहिती पण संकलित केली गेली आहे . निवडणूक प्रक्रियेत सहभागी समस्त व्यक्ती, संस्था आणी मंडळाचे व विविध संस्थांचे पदाधिकारी ह्या तपशिलाचा सखोल अभ्यास करतील आणि या संहिते प्रमाणे आपापले कार्य निष्पादित करतील अशी अपेक्षा आहे . निवडणुक प्रक्रियेत समाविष्ट विविध टप्पे खालील प्रमाणे आहेत:

- ❖ निवडणूक न्यायाधिकरण गठन
- ❖ निवडणूक अधिकारी नेमणूक
- ❖ निवडणूक अधिसूचना
- ❖ मतदाता यादीचे प्रकाशन
- ❖ टपाल माध्यमांतून मतदाना साठी अधिसूचना
- ❖ उमेदवारी अर्जांची प्राप्ती
- ❖ उमेदवारी अर्जांचे सूक्ष्म निरीक्षण
- ❖ उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज प्राप्ती
- ❖ उमेदवारांची अंतिम यादीचे प्रकाशन
- ❖ टपाल मतपत्र मतदारांस पाठविणे आणी त्यांची पुनर्प्राप्ती
- ❖ संस्थागत सभासदांना उपलब्ध मतदान सुविधा
- ❖ मतदान व्यवस्था
- ❖ मतदान प्रक्रिया
- ❖ मतमोजणी
- ❖ निवडणूक निकाल जाहीर करणे
- ❖ निवडणूक प्रक्रिया समाप्ती
- ❖ नवनिर्वाचितांचे पदभार ग्रहण
- ❖ निवडणूक अहवाल आणि निकाल संबंधात रजिस्ट्रार यांस सूचना .

## 2.1 निवडणूक न्यायाधिकरण गठन

2.1.1 बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी ची निवडणूक प्रक्रिया संपूर्ण पणे पारदर्शी असावी आणि निवडणुकीशी संबद्ध असलेल्या कुठल्या ही पक्षाची कुठल्याही प्रकाराची तक्रार असल्यास त्याचे न्यायपूर्ण आणि सत्य समर्थक रित्या निरसन करण्याच्या उद्दिष्टांनी निवडणूक न्यायाधीकरणाचे गठन होणे अपेक्षित आहे .

2.1.2 निवडणूक न्यायाधीकरण तीन सदस्यीय असेल . तिन्ही सदस्य बृहन्महाराष्ट्र मंडळाचे आजीवन किंवा संरक्षक श्रेणीचे सभासद असणे अनिवार्य आहे . "शुभचिंतक श्रेणी" चे सभासद ह्या न्यायाधिकरणात सदस्य असण्यास अपात्र असतील .

2.1.3 निवडणूक नियोजित असलेल्या सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या सर्वसाधारण सभेत निर्वाचन न्यायाधिकरण (ट्रिब्युनल) चे गठन केले जाईल . ह्या करिता सर्वसाधारण सभेत कार्यकारिणी च्या वतीनं तीन इच्छुक सभासदांचे नांव न्यायाधिकरण सदस्य म्हणून प्रस्तावित केले जाईल . सर्वसाधारण सभेत स्वतः उपस्थित असलेला अन्य कुठलाही सभासद स्वतःच्या नांवाचा प्रस्ताव पण करू शकतो . ह्याच सर्वसाधारण सभेत सर्वस्वीकृतीने किंवा गरज पडल्यास सामान्य बहुमताने ह्या त्रिसदस्यीय निवडणूक न्यायाधीकरणा चे गठन केले जाईल . ह्या संबंधी ची घोषणा सभेचे अध्यक्ष सभेत करतील आणि तत्संबंधी सूचना प्रधान कार्यवाह मार्फत मंडळाच्या मुखपत्रात आणि इंटरनेट संकेत स्थळावर अन्य सभासदांच्या सोयी करिता प्रसिद्ध केली जाईल.

2.1.4 ह्या न्यायाधिकरणाशी अथवा ह्या न्यायाधिकरणा द्वारे कुठलाही पत्र व्यवहार प्रधान कार्यवाह मार्फतच केला जाऊ शकेल . निवडणुकीच्या वेळी कुठलाही पत्र व्यवहार समक्ष होऊ शकेल पण इतर काळात हा पत्र व्यवहार टपाल माध्यमांतून केला जाईल . ह्या करिता प्रधान कार्यवाह न्यायाधिकरणाचा संपर्क पत्ता न्यायाधिकरण गठन सूचनेत प्रसिद्ध करते वेळी समाविष्ट करतील. कुठल्या ही डिजिटल माध्यमांतून (अर्थात ईमेल, व्हॉटसप्प इत्यादी) केलेला पत्र व्यवहार मान्य नसेल .

2.1.5 ह्या न्यायाधिकरणाच्या कुठल्याही सदस्यास उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक असण्याची पात्रता राहणार नाही पण त्यांना मताधिकार वापरण्याची पात्रता राहील .

2.1.6 निवडणुकी संबंधी कोणास ही कुठल्या ही प्रकारची तक्रार असल्यास त्यानं सर्वप्रथम निवडणूक अधिकारी समोर ती मांडणे अपेक्षित आहे . निवडणूक अधिकारी च्या निर्णयाशी जर कुठलीही असहमती असेल तरच संबंधित पक्ष निवडणूक न्यायाधीकरणा समोर आपली तक्रार मांडू शकतो. निवडणूक न्यायाधीकरण कुठली ही थेट तक्रार स्वीकार करणार नाही . निवडणूक अधिकारीच्या कुठल्याही निर्णया विरुद्ध तक्रार ह्या न्यायाधिकरणा समक्ष केली जाऊ शकते.

2.1.7 निवडणूक न्यायाधीकरणा समोर कुठली ही तक्रार लेखी स्वरूपात मांडणे अनिवार्य असेल . ह्या तक्रारीत सभासदांनी आपला सभासद क्रमांक, नांव, संपूर्ण टपाल पत्ता, आणि मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य असेल . तक्रार कागदावर लेखी स्वरूपात असणे आणि स्वहस्ताक्षरित असणे पण अनिवार्य असेल . कुठल्या ही डिजिटल माध्यमांतून (अर्थात ईमेल, व्हॉटसप्प इत्यादी) केलेली तक्रार स्वीकार केली जाणार नाही .

2.1.8 कुठल्याही तक्रारी च्या अथवा निर्णया संबंधात न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि ह्या निर्णय विरुद्ध कुठल्याही न्यालायात अपील स्वीकार्य नसेल.

2.1.9 निर्वाचन न्यायाधिकरणास प्राप्त तक्रारींचे निराकरण मतदान प्रारंभ होण्याच्या 12 तास आधी पर्यंतच्या कमाल वेळ मर्यादेत करणे भाग असेल .

2.1.10 कुठल्याही कारणास्तव जर निवडणूक न्यायाधीकरण गठन पश्चात न्यायाधिकरणाच्या कोणाही सदस्यास निवडणूक न्यायाधीकरणाचा सदस्य राहता येत नसेल तर तत्संबंधी सूचना प्राप्त झाल्यावर कार्यकारीणीस योग्य सभासद निवडणूक न्यायाधीकरणाचा स्थानापन्न सदस्य म्हणून नियुक्त करण्याचा अधिकार असेल . अश्या प्रमाणे केलेल्या नियुक्तीस सर्वसाधारण सभेची स्वीकृती आवश्यक नसेल . अश्या प्रकारे झालेल्या कुठल्याही नियुक्ती

संबंधीची सूचना प्रधान कार्यवाह मार्फत इंटरनेट संकेत स्थळावर तसंच पर्याप्त अवधी असल्यास मंडळाच्या मुखपत्रात अन्य सभासदांच्या सोयी करिता प्रसिद्ध केली जाईल .

## 2.2 निवडणूक अधिकारी नेमणूक

2.2.1 बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी ची निवडणूक प्रक्रिया संपूर्ण पणे पारदर्शी प्रकारे पार पाडण्याच्या उद्दिष्टानं निवडणूक अधिकारीची नियुक्ती होणे अपेक्षित आहे .

2.2.2 निवडणूक अधिकारीस बृहन्महाराष्ट्र मंडळाचा आजीवन किंवा संरक्षक श्रेणीचा सभासद असणं अनिवार्य आहे. “शुभचिंतक श्रेणी” चे सभासद निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त होण्यास अपात्र असतील .

2.2.3 निवडणूक नियोजित असलेल्या सर्वसाधारण सभेच्या अगोदरच्या सर्वसाधारण सभेत निवडणूक अधिकारी नियुक्त केला जाईल . ह्या करिता सर्वसाधारण सभेत कार्यकारिणी च्या वतीनं तीन पात्र सभासदांचे नांव वरीयता क्रमात प्रस्तुत केले जातील ज्यांच्या पैकी कोणा एका व्यक्तीस नियुक्त केले जाऊ शकेल. सर्वसाधारण सभेत स्वतः उपस्थित असलेला अन्य कुठलाही सभासद स्वतःच्या नांवाचा प्रस्ताव पण करू शकतो . ह्याच सर्वसाधारण सभेत सर्वस्वीकृतीने किंवा गरज पडल्यास सामान्य बहुमताने निवडणूक अधिकारी नियुक्त केला जाईल . ह्या संबंधी ची घोषणा सभेचे अध्यक्ष सभेत करतील आणि तत्संबंधी सूचना प्रधान कार्यवाह मार्फत मंडळाच्या मुखपत्रात आणि इंटरनेट संकेत स्थळावर अन्य सभासदांच्या सोयी करिता प्रसिद्ध केली जाईल.

2.2.4 निवडणूक अधिकारी यांचेशी अथवा निवडणूक अधिकारी द्वारे कुठलाही पत्र व्यवहार केला जाऊ शकेल ज्याची एक प्रत प्रधान कार्यवाह यांना देणे अनिवार्य असेल . निवडणुकीच्या वेळी कुठलाही पत्र व्यवहार समक्ष होऊ शकेल पण इतर काळात हा पत्र व्यवहार टपाल माध्यमांतून केला जाईल . ह्या करिता प्रधान कार्यवाह निवडणूक अधिकारी यांचा संपर्क पत्ता नियुक्ती सूचनेत प्रसिद्ध करते वेळी समाविष्ट करतील . कुठल्या ही डिजिटल माध्यमांतून (अर्थात ईमेल, व्हॉटसप्प इत्यादी) केलेला पत्र व्यवहार मान्य नसेल .

2.2.5 निवडणूक अधिकारी ह्यास उमेदवारी, प्रस्तावक किंवा अनुमोदक असण्याची पात्रता राहणार नाही आणि तसंच त्यांना निवडणूक अधिकारी असे पर्यंत मताधिकार वापरण्याची पात्रता पण असणार नाही .

2.2.6 निवडणुकी संबंधी कोणास ही कुठल्या ही प्रकारची तक्रार असल्यास त्यांना सर्वप्रथम निवडणूक अधिकारी समोर ती मांडणे अपेक्षित आहे . निवडणूक अधिकारी त्यावर नियमांप्रमाणे विचार करून आपला निर्णय जाहीर करतील . या निर्णयाशी जर कुठलीही असहमती असेल तर संबंधित पक्ष निवडणूक न्यायाधीकरणा समोर आपली तक्रार मांडू शकतो . निवडणूक न्यायाधीकरण कुठली ही तक्रार थेट स्वीकार करणार नाही . निवडणूक अधिकारीच्या कुठल्याही निर्णया विरुद्ध तक्रार ह्या न्यायाधिकरणा समक्ष केली जाऊ शकेल .

2.2.7 निवडणूक अधिकारी समोर कुठली ही तक्रार लेखी स्वरूपात मांडणे अनिवार्य असेल . ह्या तक्रारीत सभासदांनी आपला सभासद क्रमांक, नांव, संपूर्ण टपाल पत्ता, आणि मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य असेल . तक्रार कागदावर लेखी स्वरूपात असणे आणि स्वहस्ताक्षरित असणे पण अनिवार्य असेल . कुठल्या ही डिजिटल माध्यमांतून (अर्थात ईमेल, व्हॉटसप्प इत्यादी) केलेली तक्रार स्वीकार केली जाणार नाही .

2.2.8 निवडणूक अधिकारी यांना प्राप्त तक्रारींचे निराकरण मतदान प्रारंभ होण्याच्या 16 तास आधी पर्यंतच्या कमाल वेळ मर्यादेत करणे भाग असेल .

2.2.9 कुठल्याही कारणास्तव जर निवडणूक अधिकारीच्या नियुक्ती पश्चात त्यांना निवडणूक अधिकारी म्हणून कार्य निष्पादित करता येणार नसेल तर तत्संबंधी सूचना प्राप्त झाल्यावर कार्यकारीणीस योग्य सभासद स्थानपन्न निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा अधिकार असेल . अश्या प्रमाणे केलेल्या नियुक्तीस सर्वसाधारण सभेची स्वीकृती अवश्यक नसेल पण निवडणूक न्यायाधिकराणाची स्वीकृती अनिवार्य असेल. अश्या प्रकारे झालेल्या कुठल्याही नियुक्ती संबंधीची सूचना प्रधान कार्यवाह मार्फत इंटरनेट संकेत स्थळावर तसंच पर्याप्त अवधी असल्यास मंडळाच्या मुखपत्रात अन्य सभासदांच्या सोयी करिता प्रसिद्ध केली जाईल .

## 2.3 निवडणूक अधिसूचना

2.3.1 प्रधान कार्यवाह द्वारे अध्यक्ष, निवडणूक न्यायाधिकरण आणि निवडणूक अधिकारी यांचेशी विचार विमर्श करून निवडणूकीचे वेळापत्रक संबंधी प्रस्ताव कार्यकारिणीच्या स्वीकृती करिता प्रस्तुत केला जाईल .

2.3.2 ह्या प्रस्तावास निवडणुकीचे ठिकाण नमूद करण्याची आवश्यकता असणार नाही परंतु ठिकाण नमूद केल्या नंतर सुद्धा त्यात निवडणूक तिथीच्या 48 तास आधी पर्यंत परिवर्तन केले जाऊ शकेल . हे ठिकाण अधिवेशन होत असलेल्या शहरातच असणे अनिवार्य असेल . असे कुठलेही परिवर्तन निवडणूक अधिकारी द्वारे अधिसूचित केली जाईल .

2.3.3 प्रधान कार्यवाह यांनी प्रस्तुत केलेल्या प्रस्तावास कार्यकारिणी ने स्वीकृती दिल्यानंतर स्वीकृत वेळापत्रक आणि स्थळ इत्यादी प्रधान कार्यावाह द्वारे लेखी स्वरूपात निवडणूक अधिकारी यांना कळविले जाईल . ही सूचना प्राप्त झाल्यानंतर निवडणूक अधिकारी द्वारे निवडणूक अधिसूचना उमेदवारी साठीच्या अर्जा सह प्रसिद्ध केली जाईल . *(अधिसूचना आणि उमेदवारी अर्जाचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )*

## 2.4 मतदाता यादीचे प्रकाशन

2.4.1 निवडणुकां करिता निर्धारित तिथीच्या किमान तीन महिन्या पूर्वी निवडणूक अधिकारी द्वारा मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रधान कार्यवाह आणि कोषाध्यक्ष द्वारे स्वतःच्या स्वाक्षरीने सत्यापित केलेली मतदाता यादी प्रसिद्ध केली जाईल . निवडणूक अधिसूचना प्रसिद्धीच्या तारखेला बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व वैयक्तिक श्रेणीतील अश्या सभासदांना मतदान करण्याची पात्रता असेल जे सामान्यतः बृहन्महाराष्ट्रात अर्थात महाराष्ट्र राज्याच्या बाहेर निवास करतात आणि ज्यांचे बृहन्महाराष्ट्र मंडळ हितार्थ कुठले ही आर्थिक देणे शेष नाहीये. अश्या सर्व मतदात्यांची नांवे मतदाता यादीत समाविष्ट असतील. “शुभचिंतक श्रेणी” च्या सभासदांचा समावेश मतदाता यादीत केला जाणार नाही. *(मतदाता यादी चे प्रारूप खंड 4 येथे बघावे)*

2.4.2 वरील प्रमाणे प्रसिद्ध मतदाता यादी निवडणूक स्थळावर निवडणूक कार्यक्रमानुसार निवडणूक पूर्वी किमान एक दिवस आधी माहिती फलकावर लाविली जाईल .

2.4.3 वरील नमूद केल्या प्रमाणे प्रसिद्ध सूची वर कोणा ही मताधिकार प्राप्त सदस्यास कुठल्या ही प्रकारचा आक्षेप असल्यास निवडणूक अधिकारी द्वारे घोषित निवडणूक कार्यक्रमा प्रमाणे आपला आक्षेप नोंदविला जाऊ शकतो ज्याचे निरसन निवडणूक अधिकारी द्वारे मतदान प्रारंभ होण्याच्या 16 तास आधी पर्यंतच्या कमाल वेळ मर्यादेत करणे भाग असेल .

2.4.4 निवडणूक अधिकारी मतदाता यादी प्रकाशित करताना मतदाना करिता पात्र असलेल्या सर्व संस्थांची नांवे आणि प्रत्येक संस्थेला घटनेत नमूद असल्या प्रमाणे पात्रता असलेल्या मतांची संख्या पण प्रकाशित करतील . कुठल्याही परिस्थितीत कुठल्याही एका संस्थेला किमान एक मताची पात्रता अवश्य राहील .

2.4.5 मतदाता यादीच्या प्रसिद्धी उपरान्त सामान्य परिस्थितीत यादीत कुठलेही परिवर्तन होऊ घातलेल्या निवडणुकांच्या पश्चातच होतील . मात्र कुठल्याही प्रकारची तथ्यात्मक त्रुटी आढळली असल्यास मतदाता यादीत सुधारणा अध्यक्ष, प्रधान कार्यवाह आणी निवडणूक अधिकारी हे तिघेही सहमत असल्यास प्रस्तुत दस्तावेजांचे सूक्ष्म निरीक्षण झाल्या नंतर केली जाऊ शकेल .

## 2.5 टपाल माध्यमांतून मतदाना साठी अधिसूचना

2.5.1 मतदाता यादीच्या प्रसिद्धी उपरान्त निवडणूक अधिकारी द्वारे टपाल माध्यमांतून मतदान करण्यास पात्रता असलेल्या मतदातां कडून अर्ज मागविण्या करिता मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर आणि अवधि असल्यास मुखपत्रातून या संबंधीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल . *(अधिसूचनेचे प्रारूप खंड 4 येथे बघावे)*

2.5.2 खाली नमूद केलेल्या निकषांना संतुष्ट करणाऱ्या सभासदांना निवडणूक अधिकारी द्वारे मतदात्यास दिलेल्या मतपत्राचा उपयोग करून टपाल द्वारे मतदान करण्याच्या सुविधेचा उपयोग करता येईल:

2.5.2.1 निवडणूक घोषणा तिथिस किमान 75 वर्ष वय पूर्ण केलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद . अश्या व्यक्तींनी अर्जा सोबत वयाचा कुठलाही सरकारमान्य दाखला प्रस्तुत करावा.

2.5.2.2 कुठल्याही प्रकारची दिव्यांगते (विकलांगते) नी ग्रस्त असलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद. अश्या व्यक्तींनी अर्जा सोबत दिव्यांगते (विकलांगते) संबंधी डॉक्टर द्वारे सत्यापित कुठलाही सरकारमान्य दाखला, जो जास्तीत जास्त 6 महिने जुना असू शकतो, प्रस्तुत करावा . 6 महिन्या पेक्षा जुना दाखला ग्राह्य धरला जाणार नाही.

2.5.3 निवडणूक अधिकारी द्वारे टपाल माध्यमांतून मतदानास पात्र सभासदांकडून टपाल माध्यमांतून मतदान करण्या संबंधी चा अर्ज अधिसूचना प्रसिद्ध करून मागविला जाईल . ह्या अधिसूचनेत प्रकाशित अंतिम तिथी पर्यंत प्राप्त सर्व अर्जांची यादी निवडणूक अधिकारी बनवतील . ह्या यादीतील समस्त मतदात्यांस “टपाल माध्यम मतदाता” म्हणून ओळखले जाईल. काही शंका असल्यास किंवा आवश्यक वाटल्यास निवडणूक अधिकारी अर्जात नमूद मोबाईल क्रमांकावर स्वतः संबंधित सभासदाशी बोलून या संबंधीची खातरजमा करून घेतील .

## 2.6 उमेदवारी अर्जांची प्राप्ती

2.6.1 निवडणूक अधिकारी द्वारे निवडणूक अधिसूचना उमेदवारी साठीच्या अर्जा सह प्रसिद्ध केली गेल्या नंतर निवडणूक वेळापत्रकात नमूद काल मर्यादेत निर्धारित प्रारूपात कुठल्याही उमेदवारा तर्फे आपला उमेदवारी अर्ज आवश्यक संलग्नकांसह आणि प्रत्येक अर्जा करिता रुपये शंभर फक्त (रु.100/-) असे उमेदवारी अर्ज शुल्क भरले असल्याच्या पावती सह निवडणूक अधिकाऱ्या कडे प्रस्तुत केला जाऊ शकेल. हे उमेदवारी अर्ज शुल्क रुपये शंभर फक्त (रु.100/-) अप्रतिदेय असेल अर्थात कुठल्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही आणी कोणा अन्य उमेदवारा करिता देखील वापरले जाऊ शकणार नाही.

2.6.2 सर्व प्रस्तावकांनी उमेदवारीच्या अर्जासोबत प्रस्तावक, अनुमोदक आणि उमेदवार ह्या तिघा व्यक्तींची ओळख आणि निवास स्थान स्थापित करण्या करिता आधारकार्ड, पासपोर्ट, मतदाता परिचय पत्र किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स ह्या पैकी कुठलेही फोटो युक्त परिचयपत्र संलग्न करावे ज्याच्या वर नांव आणी पत्ता याचा स्पष्ट उल्लेख असेल .

2.6.3 निवडणूक अधिकाऱ्या कडे उमेदवारी अर्ज आवश्यक संलग्नकांसह वैयक्तिक रित्या उपस्थित होऊन किंवा टपाल माध्यमांतून किंवा कोणा ही संदेशवाहक मार्फत प्रस्तुत केला जाऊ शकेल . अर्ज प्राप्त झाल्यावर निवडणूक अधिकारी अर्ज प्राप्ती ची पावती देऊ शकेल ज्याच्या वर प्राप्तीची दिनांक आणि वेळ नमूद असेल .

2.6.4 शुभचिंतक सभासद श्रेणी चे सभासद वगळता इतर समस्त सभासद श्रेणींचे सभासद जे निवडणूक घोषणा तिथीस सभासद आहेत आणि ज्यांचे बृहन्महाराष्ट्र मंडळा हितार्थ कुठले ही आर्थिक देणे नाहीये, अर्थात ज्यांचे नांव मतदाता यादीत आहे, अशे सभासद मतदाता, उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास पात्र असतील.

2.6.5 एक उमेदवाराच्या करिता प्रत्येक पदा करिता अधिकतम तीन उमेदवारी अर्ज भरले जाऊ शकतात अर्थात अधिसूचित कितीही पद ज्याच्या करिता उमेदवार पात्र आहे त्या सर्व पदांकरिता उमेदवाराच्या नांवाचा प्रस्ताव केला जाऊ शकतो. पण प्रत्येक उमेदवारी अर्जात प्रस्तावक आणि अनुमोदक भिन्न भिन्न व्यक्ती असणे बंधनकारक असेल. तसंच उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी पर्यंत अश्या उमेदवारास फक्त एक पद ठरवून अन्य पदांच्या करिताचे प्रस्ताव मागे घ्यावे लागतील. जर कोणाही उमेदवाराचे नांव उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी उलटल्या नंतर एका पेक्षा जास्त पद करिता शेष असतील तर त्या उमेदवाराचे सर्व पदांकरीताचे प्रस्ताव निरस्त केले जातील.

2.6.6 कुठल्याही सभासदास निवडणूक अधिकारी द्वारा प्रसिद्ध केल्या गेलेल्या मतदाता यादीत त्यांचे नांव असल्यासच उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्याची पात्रता असेल.

2.6.7 संलग्न संस्थेचे प्रतिनिधि उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास अपात्र असतील. संस्थागत प्रतिनिधींना फक्त मतदानाचा अधिकार असेल .

## 2.7 उमेदवारी अर्जांचे सूक्ष्म निरीक्षण

2.7.1 निवडणूक अधिकारी द्वारा प्राप्त उमेदवारी अर्जाचे एक नोंदणी पत्रक (Register) तय्यार केले जाईल आणि "प्रथम प्राप्ती प्रथम नोंद" ह्या आधारावर नोंदणी केली जाईल . प्रत्येक अर्जा करिता दोन पृष्ठे राखीव असतील . प्रत्येक अर्जा करिता प्राप्ती नंतर, प्राप्ती दिनांक, अनुक्रमांक, तसंच उमेदवार, प्रस्तावक, आणि अनुमोदक यांचे सभासद क्रमांक, नांव, पत्ता आणि संलग्न दस्तावेज याचे नोंद केली जाईल .

2.7.2 सूक्ष्म निरीक्षण अंतर्गत प्रत्येक अर्जात नमूद माहिती मतदार यादी आणि संलग्न दस्तावेज च्या आधारावर सत्यते करिता पडताळून बघितली जाईल . सूक्ष्म निरीक्षण केल्यावर निवडणूक अधिकारी आपले अभिमत (कारणांसह) नमूद करतील आणि आपले सही व शिक्कामोर्तब करतील. अर्जात नमूद माहितीत काही तफावत आढळल्यास निवडणूक अधिकारी संबंधित उमेदवारी अर्ज करणाऱ्या सभासदां कडून स्पष्टीकरण मागवू शकतील. प्राप्त स्पष्टीकरणाच्या आधारावर किंवा उपलब्ध दस्तावेजांच्या आधारावर निवडणूक अधिकारी स्पष्टीकरण न मागवताच स्वतःच्या विवेकानुसार अर्ज स्वीकृत किंवा अस्वीकृत करू शकतील .

2.7.3 निवडणूक अधिकारी तदनंतर अर्जा संबंधीची स्वीकृती किंवा अस्वीकृती संबंधित अर्जदारांस अर्जात नमूद दूरध्वनी वरून कळवतील आणि तसंच अर्जात नमूद टपाल पत्त्यावर भारतीय टपाल खात्याच्या "नोंदणीकृत टपाल (Registered Post)" किंवा "स्पीड पोस्ट (Speed Post)" ह्या माध्यमांतून पण पाठवतील .

2.7.4 उमेदवारी अर्ज अर्थात नामांकन प्रस्तावांत उमेदवाराच्या सभासद क्रमांक, नांव, निवास पत्त्या संबंधीची आणि अर्जात पुरविलेली अन्य कुठली ही माहिती त्रुटीपूर्ण चुकीची असल्याचे आढळल्यास उमेदवार, प्रस्तावक, आणि अनुमोदक यांचे सभासदत्व स्वयमेव निरस्त होईल . माहिती त्रुटीपूर्ण असल्यास तशी नोंद अर्ज आणि अर्ज नोंदणी पत्रकात निवडणूक अधिकारी आपल्या सही आणि शिक्क्यानिशी करतील . सभासदत्व निरस्ती संबंधी पुढील कार्यवाही प्रधान कार्यवाह करतील आणि तशी सर्व कार्यवाही निवडणूक प्रक्रियेच्या बाहेर असेल .

2.7.5 कुठल्याही उमेदवारांनी एका पेक्षा जास्त अर्ज दाखल केले असल्यास किमान एक अर्ज स्वीकृत असल्यास देखील निवडणूकित उमेदवार असण्यास पात्रता असेल .

## 2.8 उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज प्राप्ती

2.8.1 निवडणूक अधिकारी द्वारा सूक्ष्म निरीक्षण पश्चात निवडणुकीसाठी स्वीकृत समस्त अर्ज करणारे निवडणुकीस पात्र ठरलेले उमेदवार निवडणूक अधिकाऱ्यास ठराविक प्रारूपात *(अर्जाचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )* आपली उमेदवारी मागे घ्यायचा अर्ज सादर करून आपली उमेदवारी मागे घेऊ शकतात .

2.8.2 उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज निवडणूक वेळापत्रकात नमूद कालावधीत केले जाऊ शकतात.

2.8.3 प्राप्त अर्जावर निवडणूक अधिकारी संबंधित उमेदवारांनेच अर्ज केल्या संबंधी संतुष्ट असतील तर उमेदवारास उमेदवारी मागे घेण्याची अनुमती देऊन तदनंतर मूळ उमेदवारी अर्ज आणि उमेदवारी नोंदणी पत्रकात त्या अर्जा समक्ष आपला निर्णय नमूद करतील आणि आपले सही व शिक्कामोर्तब करतील .

2.8.4 तत्पश्चात निवडणूक अधिकारी दूरध्वनी वरून आणि लेखी स्वरूपात संबंधित उमेदवारास उमेदवारी रद्द केल्या संबंधी सूचना संभव असल्यास समक्ष किंवा मूळ अर्जात नमूद टपाल पत्त्यावर भारतीय टपाल खात्याच्या "नोंदणीकृत टपाल (Registered Post)" किंवा "स्पीड पोस्ट (Speed Post)" ह्या माध्यमांतून पाठवतील .

2.8.5 कुठल्याही उमेदवारांनी एका पेक्षा जास्त अर्ज दाखल केले असल्यास आणि ते तसे स्वीकृत झाले असल्यास ज्या पदाची उमेदवारी मागे घेण्यात आली असेल त्या पदांकरिता चे सर्व स्वीकृत उमेदवारी अर्ज रद्द होतील.

2.8.6 तसंच उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी पर्यंत ज्या उमेदवार करिता एका पेक्षा जास्त पदा करीताचे निवडणूक अधिकारी द्वारा स्वीकृत प्रस्ताव शेष असतील अश्या उमेदवारास फक्त एक पद ठरवून अन्य पदांच्या करिताचे प्रस्ताव मागे घ्यावे लागतील. जर कोणाही उमेदवाराचे नांव / अर्ज / प्रस्ताव, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची तिथी

उलटल्या नंतर एका पेक्षा जास्त पद करिता शेष असतील तर त्या उमेदवाराचे सर्व पदांकरीताचे प्रस्ताव निरस्त केले जातील.

2.9 उमेदवारांची अंतिम यादीचे प्रकाशन

2.9.1 निवडणूक अधिकारी द्वारा निवडणूक वेळापत्रकाच्या प्रमाणे उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा कालावधी व्यतीत / पूर्ण झाल्या पश्चात उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल. ही यादी कार्यकारिणीच्या प्रत्येक पद करिता आणि तसंच प्रत्येक विभागातील विभागीय कार्यवाह या पद करिता असेल .

2.9.2 निवडणूक अधिकारी द्वारा ही यादी मतदाता सभासदांच्या सोयी करिता मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर आणि अवधि असल्यास मुखपत्रातून प्रसिद्ध केली जाईल . *(उमेदवारांच्या अंतिम यादीचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )*

2.9.3 ह्याच यादीत कुठल्याही पदा करिता जर एकच व्यक्तीचे अर्ज स्वीकृत झाला असेल तर हे पद मतदाना करिता नसेल अशी ही घोषणा निवडणूक अधिकारी करतील आणि निवडणूक निकालांत निर्विरोध निवडले गेल्या संबंधीची घोषणा करतील .

2.9.4 ह्याच यादीत कुठल्याही पदा करिता जर एकाही व्यक्तीचा स्वीकृत अर्ज शेष नसेल तर तशी घोषणा निवडणूक अधिकारी करतील आणि निवडणूक निकालांत पद रिक्त असल्या संबंधीची घोषणा करतील . ह्या रिक्त पदांवर निवडणुकी पश्चात घटना नियमावली च्या तरतुदी अनुसार कार्यकारिणी योग्य निर्णय घेण्यास सक्षम असेल .

2.10 टपाल मतपत्र मतदारांस पाठविणे आणी त्यांची पुनर्प्राप्ती

2.10.1 अंतिम उमेदवार यादी जाहीर केल्या नंतर मतदान आवश्यक असल्यास निवडणूक तिथी वगळून निवडणूक तिथीच्या किमान तीस (21) दिवस आधी निवडणूक अधिकारी, कार्यकारिणी आणि विभागीय पदांसाठी नियत असलेले मतपत्र आपल्या सही व शिक्क्यानिशी प्रत्येक टपाल माध्यम मतदात्यास आपल्या अर्जात पुरविलेल्या टपाल पत्त्यावर भारतीय टपाल खात्याच्या “नोंदणीकृत टपाल (Registered Post)” किंवा “स्पीड पोस्ट (Speed Post)” ह्या माध्यमांतूनच पाठवतील. ह्या मतपत्रा सोबत टपाल माध्यमांतून मतदान कसे करावयाचे ह्या संबंधीचे निर्देशपत्र आणि तसंच उलट टपाली मत पाठविण्या साठी छोटा लिफाफा आणि पाठविण्याचा पत्ता नमूद असलेला मोठा लिफाफा पण पाठविण्यात येईल .

2.10.2 टपाल माध्यम मतदाता यांच्या कडून टपाल माध्यमांतून मतदान करण्यासाठी टपाल खर्च वगळता अन्य कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही . प्रत्येक निवडणूक अधिसूचने आधी कार्यकारिणी सांप्रत टपाल दरांच्या आधारावर घेतला जाणारा टपाल खर्च पण ठरवील ज्याचा उल्लेख टपाल माध्यमांतून मतदानाच्या अधिसूचनेत अनिवार्यत: असेल .

2.10.3 टपाल मतपत्र प्राप्त झाल्यावर संबंधित मतदाता मतदान निर्देश पत्र वाचतील आणि त्यातील निर्देशांप्रमाणे आपल्या पसंतीच्या उमेदवारांस अधिकृत मतपत्रात आपले मत अंकित करतील. तदनंतर हे मतपत्र सोबत असलेल्या छोट्या लिफाफ्यात टाकून निर्देशाप्रमाणे सीलबंद करतील आणि नंतर हा छोटा लिफाफा मोठ्या लिफाफाफ्यात टाकून मोठा लिफाफा बंद करून भारतीय टपाल खात्याच्या “नोंदणीकृत टपाल (Registered Post)” किंवा “स्पीड पोस्ट (Speed Post)” ह्या माध्यमांतूनच निर्देशित पत्त्यावर उलट टपाली अश्या अवधीत पाठवतील कि ते मतपत्र निर्धारित अवधीत निवडणूक अधिकारी यांना प्राप्त होईल .

2.10.4 मतदानाची गोपनीयता अक्षुण्ण ठेवण्याकरिता ही काळजी घेतली जाईल कि टपाल मतपत्रावर किंवा आतल्या छोट्या लिफाफ्यावर असा कुठला ही आकडा, शब्द किंवा चिन्ह उमटविले जाणार नाही जेणे करून मतदाता कोण आहे हा अंदाज बांधला जाऊ शकेल .

2.10.5 टपाल मतपत्रावर आणि संलग्न छोट्या लिफाफ्यावर संबंधित टपाल माध्यम मतदात्यास पाठविण्या आधी निवडणूक अधिकारी योग्य स्थानी आपले हस्ताक्षर आणि शिक्कामोर्तब करतील.

2.10.6 निर्धारित अवधीत उलट टपाली प्राप्त मतपत्र असलेले लिफाफे सांभाळून ठेवले जातील जे निवडणूक मतमोजणीच्या वेळीस उघडले जातील .

## 2.11 संस्थागत सभासदांना उपलब्ध मतदान सुविधा

2.11.1 संस्थागत सभासदांना आपले मत आपल्या कार्यकारिणीच्या सदस्यां मार्फत किंवा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणी सदस्याच्या मार्फत प्रातिनिधिक मत (प्रॉक्सी मत) द्वारे देता येण्याचे दोन विकल्प उपलब्ध असतील .

2.11.2 निवडणूक अधिकारी प्रत्येक संस्थेला त्यांना उपलब्ध मतदान पद्धती कळवतील आणी मतदान करण्याचे आवाहन करतील . संस्था आपली मतदान पद्धती ठरवून तशी सूचना आणि निवडलेल्या विकल्पा प्रमाणे अधिकृत व्यक्ति संबंधी ची माहिती उपयुक्त प्रारूपात निवडणूक अधिकारी यांच्या पत्रातील निर्देशा प्रमाणे प्रस्तुत करतील .

2.11.3 संस्थेला मतदाता यादी प्रमाणे पात्रता असलेल्या मतांच्या संख्येच्या एवढे प्रतिनिधी पाठविता येतील पण जर संस्था प्रातिनिधिक मत (प्रॉक्सी मत) द्वारे मतदान करणार असेल तर पात्र मतांच्या संख्ये एवढी मतपत्रे त्या अधिकृत व्यक्तीस निवडणूक अधिकारी द्वारे निवडणूक समयी देण्यात येतील .

2.11.4 बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणी सदस्या कडे एका पेक्षा जास्त संस्थांची प्रातिनिधिक मते असू शकतात. पण अश्या एका निर्वाचित सदस्या द्वारे जास्तीत जास्त तीन (3) संस्थांच्या वतीनं प्रातिनिधिक मतदान केले जाऊ शकते. अश्या परिस्थितीत त्या सदस्याकडे उपलब्ध एकूण प्रातिनिधिक मतांच्या संख्ये एवढी मतपत्रे निवडणूक अधिकारी एकाच वेळेस त्या व्यक्तीस निवडणुकी दरम्यान स्वतः देतील आणि तेव्हांच मतदान ही करवून घेतील . अश्या मतदात्यानी वैयक्तिक क्षमतेत मतदान ही ह्याच वेळेस करावे कारण मतदान अधिकारी बोटावर अमित शाई लागलेली असल्यास पुनः मतदानास परवानगी देणार नाहीत .

## 2.12 मतदान व्यवस्था

### 2.12.1 मतदाता यादी फलकावर लावणे

निवडणुकां करिता निर्धारित तिथीच्या किमान तीन महिन्या पूर्वी निवडणूक अधिकारी द्वारा मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रधान कार्यवाह आणि कोषाध्यक्ष द्वारे स्वतःच्या स्वाक्षरीने सत्यापित केलेली मतदाता यादी प्रसिद्ध केली जाईल . ह्याच मतदाता यादीची सत्यापित प्रत निवडणूक अधिकारी द्वारा निवडणूक स्थळावर निवडणूक पूर्वी किमान एक दिवस आधी माहिती फलकावर लाविली जाईल . *(मतदाता यादी चे प्रारूप खंड 4 येथे बघावे )*

### 2.12.2 मतदान अवधी

मतदाना करिता सर्व मतदारांस निवडणूक वेळा पत्रका मध्ये निर्देशित कालावधी प्रमाणे मतदान करण्याची पात्रता असेल . जर ठराविक वेळेत मतदान करण्यास सिद्ध असलेले मतदाता शेष असतील तर अश्या सर्व मतदात्यांनी मतदान करे पर्यंत मतदान अवधी निवडणूक अधिकारी द्वारा वाढविण्यात येईल आणि तशी घोषणा मतदान प्रासादात करण्यात येईल .

### 2.12.3 मतदान कक्ष आणि आतील व्यवस्था ठरविणे

मतदात्यांच्या अपेक्षित संख्येच्या प्रमाणात मतदान कक्ष आणि मतपेट्यांची संख्या ठरविली जाईल. सामान्यतः 500 मतदारांच्या करिता एक कक्ष असेल आणि प्रत्येक कक्षात एक मतपेटी असेल. सर्वमतदान कक्ष एका मोठ्या हॉल मध्ये सुद्धा असू शकतात किंवा वेगवेगळया खोल्यात सुद्धा असू शकतात . ह्या संबंधी निर्णय उपलब्ध भवनप्रासादाच्या आकार आणि प्रकार अनुसार निवडणूक अधिकारी घेतील . मतदाना साठी प्रयुक्त प्रत्येक हॉल अथवा खोलीत येण्याचे आणि जाण्याचे दोन पृथक मार्ग ठेवावे आणि बाहेर जाण्याच्या मार्गावरून कोणी प्रवेश करणार नाही अशी दक्षता घ्यावी. मतदाता द्वारे आपले मत अंकित करतांना त्याच्या मताची गोपनीयता भंग पावणार नाही अश्या प्रकारे मतदान कक्षाची रचना हवी . मतदान हॉल च्या बाहेर प्रसादातच मतदात्यांना आपापला मतदाता सूची क्रमांक बघता येईल ह्या करिता एक काउंटर स्थापित करण्यात येईल जिथे एक किंवा दोन मतदान सहायक, मतदाता यादी घेऊन बसतील . ह्या मुळे मतदान समयी लागणारा वेळ कमी होईल .

2.12.4 मतदान प्रासादात एक दिवसा पूर्वी व्यवस्थेस अंतिम रूप देणे

मतदान प्रासादात कक्ष स्थापना, मतपेटी ठेवणे, टेबल खुर्च्या लावणे, ठिकठिकाणी सूचना फलक लावणे, दिशा प्रदर्शक फलक लावणे इत्यादी व्यवस्था मतदानापूर्वीच्या दिवशी निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनात स्थापित करण्यात येतील. सर्व व्यवस्था यांची पूर्वपाहणी निवडणूक अधिकारी, प्रधान कार्यवाह आणि सर्व उमेदवार करतील. उमेदवारांचे काही सुझाव अथवा सूचना असतील तर नियमांतर्गत निवडणूक अधिकारी त्या संबंधी निर्णय घेतील .

2.12.5 मतपेटी व्यवस्था कार्यकर्ता व्यवस्था

निवडणूक अधिकारी आवश्यक संख्येत मतपेट्या उपलब्ध आहेत आणि गरज पडल्यास जादा मतपेट्या उपलब्ध असतील ह्या कडे लक्ष पुरवतील . तसंच एकूण संपूर्ण निवडणूक गतिविधी सुचारू रूपाने संपन्न करण्या करिता मंडळाच्या वतीनं आवश्यक संख्येत कार्यकर्ता आणि मनुष्यबळ उपलब्ध करवून दिलं जाईल . तसंच मंडळाच्या वतीनं आवश्यक प्रमाणात लागणारी स्टेशनरी , फर्निचर आणि इतर विविध सामान पण उपलब्ध करवून दिलं जाईल.

2.12.6 मतदाता रांग, विचरण आणि कक्ष व्यवस्था

मतदान प्रासादात मतदान अवधीत समस्त मतदात्यांकरिता रांग लावण्यासाठी सावली युक्त जागा उपलब्ध असेल ह्या कडे मंडळा तर्फे लक्ष पुरविले जाईल . मतदाता त्यांना निषिद्ध असलेल्या क्षेत्रात वावरणार नाही ह्याची काळजी प्रासाद आणि कक्ष व्यवस्था ठरवितांना घेतली जाईल .

2.12.7 पिण्याचे पाणी

निवडणूक अधिकारी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मदतीनं मतदान प्रासादात मतदान अवधीत पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध असेल ह्या कडे लक्ष पुरवतील .

2.12.8 स्वच्छतागृहे आणि व्यवस्था

निवडणूक अधिकारी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मदतीनं मतदान प्रासादात किंवा जवळच मतदान अवधीत महिला व पुरुषां करिता स्वच्छता गृह उपलब्ध असेल ह्या कडे लक्ष पुरवतील .

2.13 मतदान प्रक्रिया प्रारंभ

सर्वप्रथम निवडणूक अधिकारी मतदाना करिता आवश्यक असलेल्या वस्तू आणी व्यक्ती यांच्या उपलब्धतेची खात्री करून घेतील . निवडणूक प्रारंभ व्हायच्या किमान अर्धा तास आधी सर्व उपलब्ध इच्छुक उमेदवारांच्या आणि अन्य कोणाही दोन सभासदांच्या उपस्थितीत समस्त मतपेट्या व्यवस्थित बंद आहेत आणि मते टाकायच्या व्यतिरिक्त त्यात अन्य कुठले ही छिद्र/फट/भेग इत्यादी नाहीये अशी खात्री करून घेतील. नंतर तशी घोषणा लिहून स्वतःच्या आणि किमान दोन उमेदवारांच्या आणि दोन अन्य सभासदांच्या स्वाक्षरी असलेला कागद प्रत्येक मतपेटीवर चिकटवतील . मतदान प्रारंभ होण्याची वेळ होताच निवडणूक अधिकारी तशी घोषणा करतील आणि मतदानास प्रारंभ होईल .

2.13.1 मतदान प्रक्रिया

प्रत्येक मतदान कक्षात सर्वप्रथम मतदान अधिकारी क्रमांक 1 द्वारे मतदाता यादी प्रमाणे मतदात्याची ओळख सत्यापित करण्यात यावी . ह्या करिता फोटो युक्त बृहन्महाराष्ट्र मंडळ ओळख पत्र किंवा शासनमान्य अन्य फोटोयुक्त ओळख पत्र जसे आधार कार्ड , पॅन कार्ड ,पासपोर्ट , व ड्राईव्हिंग लायसेन्स पण मान्य असतील . संस्था प्रतिनिधी मतदाता असल्यास निश्चित प्रारूप मध्ये असलेले अधिकार पत्र पण बघितले जाईल आणि त्यावर “X” असे मोठ्या आकारात चिन्ह उमटवून मतदान अधिकारी द्वारा हस्ताक्षर केले जातील . *(संस्था प्रतिनिधी मतदान अधिकार पत्राचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )* मतदाता यादीवर संबंधित मतदात्याचे नांव चिन्हित करावे आणि मतदाताच्या उजव्या हाताच्या तर्जनी वर अमिट शाई लावण्यात यावी जेणे करून कोणासही एका पेक्षा जास्त मत देता येऊ नये . उजवा हात नसल्यास डावा हाताच्या बोटावर शाई लावावी . तर्जनी नसल्यास त्या जवळच्या उपलब्ध बोटावर शाई लावावी . मतदाता यादीची ही प्रत मतदान अधिकारी क्रमांक 1 द्वारा संपूर्ण मतदान अवधीत सतत स्वतः जवळ बाळगावी . ओळख सत्यापित झाल्यानंतर मतदात्यास मतदान अधिकारी क्रमांक 2 द्वारे कार्यकारिणी आणि त्याच्या विभागाच्या विभागीय कार्यवाह यांच्या करिता नियोजित असलेले मतपत्र देण्यात येईल आणि मतदान नोंदणीपत्रकात(Voting Register) *(मतदान नोंदणी पत्रकाचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )* मतदान केल्याची नोंद करून त्यावर मतदात्याचे हस्ताक्षर सही/प्राप्त केले जाईल . मतपत्रात कुठल्याही प्रकारचे निवडणूक चिन्ह नसेल .

मतपत्रावर पद आणि त्या पदाकरिता उभे असलेले उमेदवार यांचे नांव असेल . उमेदवाराच्या नांवा समोर मत अंकित करण्या संबंधीचे स्थान असेल . उमेदवारांची संख्या बघून निवडणूक अधिकारी वेगवेगवेगळया पदांकरिता भिन्न भिन्न मतपत्राची योजना करू शकतात . *(मतपत्राचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )* मतदान अधिकारी क्रमांक 2 पण आपल्या जवळ मतदाता यादी ची एक सत्यापित प्रत मतदान अवधीत सतत बाळगेल ज्याचा उपयोग मतदात्याचा विभाग स्थापित करण्या करिता केला जाऊ शकेल . या नंतर मतदाता मतदान कक्ष मध्ये जाऊन आपले मत अंकित करून मतपत्र मतपेटीत टाकील आणि बहिर्गमन करेल . मतपत्रावर मत अंकित करण्या करिता मतचिन्हाचा शिक्का प्रयुक्त होईल ज्याच्या उपयोगाने हे स्पष्ट होऊ शकेल कि मूळ चिन्ह कुठले आणि प्रतिबिम्बित चिन्ह कुठले जे मतपत्र घडी केल्या मुळे उमटण्याची शक्यता असू शकते . *(मतचिन्ह शिक्क्याचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )* दोन्ही मतदान अधिकाऱ्यांच्या मदती करिता किंवा अन्य निवडणूक कार्या करिता निवडणूक अधिकारी पर्याप्त संख्येत मतदान सहायक यांची नेमणूक करू शकतात .

2.13.2 मतदान आणि मतदाता सुविधा निर्णय

निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्या नंतर आणि मतदान पश्चात निकाल जाहीर होण्याच्या मधल्या कालावधीत पारदर्शी निवडणूक होण्या करिता तसंच मतदात्यांच्या सुविधे करिता आवश्यक वाटत असलेले अन्य कुठले ही निर्णय, जे ह्या निवडणूक संहितेत समाविष्ट असलेल्या कुठल्या ही नियम अथवा प्रक्रियेच्या विपरीत नसतील, निवडणूक अधिकारी घेवू शकतात आणि त्याच्या अंमलबजावणी साठी प्रधान कार्यवाह यांचे सहकार्य घेवू शकतात .

2.13.3 मतदान समाप्ती घोषणा

जर ठराविक वेळेत मतदान करण्यास सिद्ध असलेले मतदाता शेष असतील तर अश्या सर्व मतदात्यांनी मतदान करे पर्यंत मतदान अवधी निवडणूक अधिकारी द्वारा वाढविण्यात येईल आणि तशी घोषणा मतदान प्रासादात करण्यात येईल . मतदान समाप्त होण्याची वेळ होताच रांगेत मतदान करण्यास सिद्ध असलेला अंतिम मतदाता आपले मतदान करताच किंवा त्या वेळी मतदान उत्सुक मतदाता शेष नसल्यास, निवडणूक अधिकारी मतदान संपले असल्याची घोषणा करतील व मतदान समाप्त होईल .

2.13.4 मतदान समाप्ती उपरांत प्रक्रिया

मतदान समाप्त झाल्याची घोषणा केल्या नंतर निवडणूक अधिकारी द्वारा सर्व मतपेट्या एका ठिकाणी आणून त्यावर मतपत्र प्रविष्ट करण्याचे स्थान व्यवस्थितपणे कागद चिकटावून सीलबंद करण्यात येईल . ह्या कागदावर निवडणूक अधिकारी द्वारा आणि किमान कुठलेही दोन उमेदवार आणि दोन अन्य सभासद यांची सही घेतली जाईल आणि ते स्वतः ही तत्पश्चात सही करतील . त्यानंतर निवडणूक अधिकारी मतमोजणी प्रारंभ करण्याची वेळ घोषित करतील . मतमोजणी प्रारंभ होण्या पर्यंत सर्व सीलबंद केलेल्या मतपेट्या सुरक्षित ठेविण्याची जबाबदारी निवडणूक अधिकारी यांची असेल .

## 2.14 मतमोजणी

2.14.1 मोजणी तंत्र

निवडणूक अधिकारी द्वारे घोषित मतमोजणी प्रारंभ करण्याची वेळ झाली कि निवडणूक अधिकारी मतमोजणी प्रक्रियेस किमान दोन उमेदवारांच्या आणि दोन अन्य सदस्यांच्या उपस्थितीत निवडणूक अधिकारी सर्व मतपेट्यांची सील निष्प्रभावी घोषित करतील आणि तोडतील . मतमोजणी प्रक्रियेत प्रत्येक उमेदवार किंवा त्याचा एक प्रतिनिधी मोजणी प्रक्रियेत सुरक्षित अंतरावर राहून मोजणी प्रक्रियेत साक्षी किंवा सहभागी होऊ शकतील . पद अथवा विभाग प्रमाणे मतपत्रे एकत्र करतील जेणे करून मतमोजणी सुकर होईल . प्रत्येक प्रकारच्या मतपत्राचे, 50 – 50 मतपत्रांचे आणि शेवटी उर्वरित संख्येत मतपत्रांचे बंडल/गठ्ठे बनविले जातील . एका वेळेस एका फेरीत एक गठ्ठा मोजला जाईल . एक फेरी मोजून झाल्यानंतर निवडणूक अधिकारी त्या फेरीतील मतपत्रांवर नमूद असलेल्या सर्व उमेदवारांना क्रमा क्रमाने पदा प्रमाणे त्या फेरीत प्राप्त मान्य आणि एकूण अमान्य मतांची संख्या घोषित करतील . प्रत्येक मतपत्रावर जर एका पेक्षा अधिक पदांसाठीची उमेदवारांची नांवे असतील तर कुठल्याही एका पदा करिता अपेक्षित संख्ये पेक्षा जास्त उमेदवारांस जर शिक्कामोर्तब केले असेल अर्थात मत दिले असेल तर ते संपूर्ण मतपत्र अमान्य करण्यात येईल आणि कुठल्याही पदा करिता त्या मतपत्रावरील मते अमान्य असतील .

2.14.2 टपाल मतपत्र मोजणी

मतमोजणी प्रक्रिया प्रारंभ झाल्यावर निवडणूक अधिकारी मतपेट्यांतील मते मोजण्या आधी टपाल माध्यमांतून झालेल्या मतदानाची मोजणी करतील . निवडणूक अधिकारी सर्वप्रथम त्यांचे जवळ असलेले सर्व उलट टपाली प्राप्त टपाल मतपत्र असलेले लिफाफे सर्वांसमोर ठेवतील . कुठलाही लिफाफा फाटला असल्यास किंवा गोपनीयता भंग पावलेल्या स्थितीत आढळून आला असल्यास मोजणीतून बाद ठरविला जाईल आणि त्यांतील सर्व मते अमान्य मते म्हणून घोषित होतील . अन्य सर्व लिफाफे सांभाळून उघडले जातील आणि त्यांतील मतपतत्रांचे वर नमूद प्रक्रियेनुसार गठ्ठे बनविले जातील . अश्या प्रकारे सर्व मान्य मतपत्रांचे गठ्ठे बनल्या नंतर वर नमूद प्रक्रीये प्रमाणे मोजणीच्या फेरी घेण्यात येतील . सर्व फेरी संपल्या नंतर मतपेट्यांतील मते मोजण्याची प्रक्रिया आरंभिली जाईल .

2.14.3 मतपेटीतील मतपत्रांची मोजणी

टपाल मतांच्या मोजणीच्या सर्व फेरी संपल्या नंतर मतपेट्यांतील मते मोजण्याची प्रक्रिया आरंभिली जाईल . सर्वप्रथम एक मतपेटी घेतली जाईल आणि ती व्यवस्थित प्रमाणे सीलबंद अवस्थेत आहे हे सर्वांना दाखविले जाईल . तत्पश्चात त्याची सील तोडण्यात येईल आणी मतपेटी उघडण्यात येईल . त्यांतील सर्व मतपत्रे एकत्र करून वर नमूद केल्या प्रमाणे गठ्ठे बनविले जातील आणि मत मोजणी प्रारंभ केली जाईल . निवडणूक अधिकारीच्या सोयी प्रमाणे सर्व मतपेट्या एकाच वेळेस उघडून मतपत्रांचे गठ्ठे बनविले जाऊ शकतात किंवा एक मतपेटीतील सर्व मते मोजून झाल्यावर पुढील मतपेटी उघडली जाईल . अश्या प्रकारे सर्व मतपत्रांचे गठ्ठे बनल्या नंतर वर नमूद प्रक्रीये प्रमाणे मोजणीच्या फेरी घेण्यात येतील .

2.14.4 प्राप्त मतांचा तक्ता बनविणे

प्रत्येक मतपत्र उघडून सर्व उमेदवार किंवा उमेदवार प्रतिनिधी यांना दाखवून पदा प्रमाणे कोणा कोणा उमेदवारांस मत प्राप्त झाले आहे हे घोषित केले जाईल आणि त्या उमेदवाराच्या नांवा समोर मततक्त्यात पहिल्या मतास 1 आणि प्रत्येक पुढील मतास अधिक 1 अर्थात “+1” अशी नोंद केली जाईल . प्रत्येक फेरी करिता नवा तक्ता वापरण्यात येईल . फेरी पूर्ण झाली कि प्रत्येक उमेदवारांस प्राप्त मान्य मतांची बेरीज योग्य ठिकाणी नोंदविली जाईल आणि शेवटी निवडणूक अधिकारी त्या बेरजेस सत्यापित करत स्वाक्षरी करतील . *(मतांच्या तक्त्याचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )* तदनंतर पुढील फेरी प्रारंभ होईल . ह्या दरम्यान उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी मत कोणाला ह्या संबंधी कुठलाही संभ्रम असल्यास किंवा अन्य कुठल्या ही प्रकारची आपत्ती असल्यास ती प्रकट करू शकतील. निवडणूक अधिकारी त्याचे निरसन तात्काळ तेथेच करतील . ह्या संबंधात निवडणूक अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल .

2.15 निवडणूक निकाल जाहीर करणे

टपाल मते आणि मतपेटीतील मते यांच्या मोजणीच्या सर्व फेऱ्या संपल्या कि निवडणूक अधिकारी प्रत्येक उमेदवारांस प्रत्येक फेरीची प्राप्त मतांची बेरीज करून एकुण प्राप्त टपाल मते आणि एकूण प्राप्त मतपेटीतील मते घोषित करतील आणि या दोन्ही मतांची बेरीज करून प्रत्येक उमेदवारांस प्राप्त एकूण मतांची संख्या घोषित करतील . सर्वप्रथम विभागीय कार्यवाह पदांकरिता निवडून आलेल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली जाईल व तत्पश्चात कार्यकारिणी च्या पदांकरिता निवडून आलेल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली जाईल .

2.15.1 सर्वप्रथम निर्विरोध निवड असल्यास जाहीर करणे निवडणूक अधिकारी

निवडणूक अधिकारी सर्वप्रथम निवडणुकीसाठी अधिसूचित पदा प्रमाणे कोणी उमेदवार निर्विरोध निवडून आला असल्यास त्याच्या नांवाची घोषणा त्या पदा करिता निवडून आलेला विजयी उमेदवार म्हणून जाहीर करतील .

2.15.2 मतमोजणी पश्चात विजयी उमेदवारांची घोषणा

निर्विरोध निवडून आलेले उमेदवार असल्यास त्यांच्या नावांची घोषणा केल्या नंतर निवडणूक अधिकारी निवडणुकीसाठी अधिसूचित पदा प्रमाणे त्या पदा करिता सर्वाधिक मते प्राप्त केलेल्या उमेदवाराच्या नांवाची घोषणा त्या पदा करिता निवडून आलेला विजयी उमेदवार म्हणून जाहीर करतील .

2.15.3 समान पदा करिता प्राप्त मते समान असल्यास विजयी उमेदवार ठरवायची विधी

मतमोजणीतील सर्व फेऱ्या समाप्त झाल्या आणि त्यानंतर कुठल्याही पदा करिता जर सर्वाधिक प्राप्त मतांची संख्या एका पेक्षा जास्त उमेदवारांकरिता समान असली तर फक्त त्याच पदा करिता प्राप्त मतांची फेरमोजणी केली जाईल . जर फेरमोजणी नंतर ही कोणी एक विजयी उमेदवार प्राप्त झाला नाही तर सर्वाधिक संख्या असलेल्या उमेदवारांतील ज्या उमेदवाराचा बृहन्महाराष्ट्र मंडळाचा सभासद क्रमांक सर्वात कमी असेल अर्थात ज्याचे सभासदत्व सर्वांत जास्त काळाचे असेल त्या उमेदवारांस विजयी घोषित करण्यात येईल .

2.15.4 निर्वाचन प्रमाणपत्र प्रदान करणे

विजयी घोषित प्रत्येक उमेदवारांस निवडणूक अधिकारी स्वतःच्या स्वाक्षरी व शिक्कामोर्तब असलेले निर्वाचन प्रमाणपत्र प्रदान करतील ज्याच्यावर उमेदवाराचे संपूर्ण नांव, सभासद क्रमांक, निर्वाचित झालेल्या पदाचे नांव, निर्विरोध निर्वाचन असल्यास तसा उल्लेख अथवा त्या पदा करीता प्राप्त एकूण मान्य मतांची संख्या, आणि त्या उमेदवारास प्राप्त मतांची संख्या ही माहिती नमूद असेल .
*(निर्वाचन प्रमाणपत्राचे प्रारूप खंड 4 येथे बघावे )*

2.15.5 पद रिक्त घोषित करणे

कुठल्याही कारणास्तव जर कोणच्या ही पदा करीता पात्र उमेदवार अनुपलब्ध असेल तर निवडणूक अधिकारी द्वारा ते पद रिक्त असल्याचे घोषित करण्यात येईल आणि नवीन कार्यकारिणी द्वारा पदभार ग्रहण केल्या नंतर घटना व नियमावलीत उल्लेखित प्रक्रीये प्रमाणे रिक्त पदावर समायोजन करण्यात येईल .

2.16 निवडणूक प्रक्रिया समाप्ती

2.16.1 निवडणूक अधिकारी चा अहवाल

निर्वाचन प्रमाण पत्रे प्रदान केल्या नंतर पंधरा (15) दिवसांच्या आंत निवडणूक अधिकारी आपला विस्तृत अहवाल प्रधान कार्यवाह यांना देतील . ह्या अहवालात निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध केल्या पासून निर्वाचन प्रमाणपत्र प्रदान करे पर्यंत प्रत्येक महत्वपूर्ण घटना आणि घेतलेले निर्णय ह्या संबंधी आपले कथन लेखी स्वरूपात समाविष्ट करतील .

2.16.2 निवडणूक अधिकारी द्वारा सर्व रेकॉर्ड कार्यकारिणीस हस्तांतरित करणे

निवडणूक अधिकारी आपल्या द्वारे निवडणूक प्रक्रिया झाल्या नंतर जो अहवाल सादर करतील त्या सोबतच निवडणुकीशी संबंधित सर्व रेकॉर्ड अर्थात समस्त पत्र व्यवहार, प्राप्त अर्ज, निर्णयपत्रे, मोजणीतक्ते, मतपत्रे, नोंदणी पुस्तिका इत्यादी प्रधान कार्यवाह मार्फत कार्यकारीणीच्या आधिपत्यात देतील . ह्या गतीविधी बरोबरच संपूर्ण निवडणूक प्रक्रिया समाप्त होईल . निवडणूक अधिकारी द्वारा दिले गेलेले सर्व दस्तावेज व रेकॉर्ड चे कार्यकारिणी द्वारा न्यूनतम तीन वर्षे जतन केले जाईल . तत्पश्चात ही हे रेकॉर्ड जतन करण्या संबंधी कुठलाही वैधानिक किंवा न्यायालयीन आदेश नसेल तर त्या स्थितीत कार्यकारिणी द्वारे निर्णय घेवून किमान तीन कार्यकारिणी सदस्य व किमान दोन विभागीय कार्यवाह ह्याच्या उपस्थितीत हे रेकॉर्ड दहन करून नष्ट केले जाऊ शकते .

2.17 नवनिर्वाचितांचे पदभार ग्रहण

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या प्रभावशील असलेल्या घटना व नियमावलीत उल्लेखित असलेल्या कालमर्यादेत आणि प्रि ये प्रमाणे नवनिर्वाचित कार्यकारिणी आपला पदभार व कार्यभार ग्रहण करेल .

2.18 निवडणूक अहवाल आणि निकाल संबंधात रजिस्ट्रार यांस सूचना

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नवीन कार्यकारिणी द्वारा कार्यभार ग्रहण केल्या नंतर निवडणूक अहवाल आणि घोषित निकाल व तदनंतर नवीन कार्यकारिणीने कार्यभार ग्रहण केल्या संबंधीची सूचना रजिस्ट्रार फर्म्स दिल्ली प्रशासन ह्यांच्या निदर्शनास योग्य माध्यमांतून आणून दिली जाईल .

# खंड 3 : निवडणूक नियमावली व आचरण अपेक्षा

## 3.0 अध्याय परिचय

मागील अध्यायात निवडणूक प्रक्रियेचे विस्तृत वर्णन करतांना विविध नियम आणि विभिन्न घटकांद्वारे अपेक्षित आचरण याचा उल्लेख केला गेला आहेच तरी प्रस्तुत अध्यायात विविध महत्वपूर्ण नियम आणि विविध घटकांकडून अपेक्षित आचरण ह्या संबंधीचा समेकित स्पष्टोल्लेख केला गेला आहे . हे नियम व आचरण अपेक्षा खालील प्रमाणे आहेत :

3.1 बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी ची निवडणूकीत पात्र सभासद व्यक्तिगत आधारावरच सहभागी होऊ शकतो . निवडणुकीत अनेक उमेदवार एक समूह (पेनल) चे गठन मतदात्यांत आपल्या ओळखी साठी करू शकतात पण निवडणूक प्रक्रियेत अश्या समूह (पेनल) चे काहीच अस्तित्व असणार नाही आणि प्रत्येक उमेदवारांस एक स्वतंत्र सभासद म्हणूनच ओळखले जाईल .

3.2 बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी ची निवडणूक प्रक्रिया संपूर्ण पणे पारदर्शी प्रकारे पार पाडण्याच्या उद्दिष्टानं निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक अधिकारी व निवडणूक सहायक कार्यकर्त्यांची नियुक्ती होणे अपेक्षित आहे .

3.3 संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात होतील ह्या करिता निवडणुकांशी निगडीत सर्व अधिकारी व कार्यकर्ते यांनी कोणत्याही उमेदवाराची बाजू न घेता निष्पक्षपणे व नियमाप्रमाणे कार्ये निष्पादित करावी . तसंच मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणाऱ्या किंवा प्रलोभन देण्याऱ्या सर्व योजनांवर आणि कृत्यांवर लक्ष ठेवून अंकुश ठेवावा .

3.4 निवडणूक न्यायाधीकरण तीन सदस्यीय असेल . तिन्ही सदस्य बृहन्महाराष्ट्र मंडळाचे आजीवन किंवा संरक्षक श्रेणीचे सभासद असणे अनिवार्य आहे . “शुभचिंतक श्रेणी” चे सभासद ह्या न्यायाधिकरणात सदस्य असण्यास अपात्र असतील .

3.5 निवडणूक न्यायाधिकरणाच्या कुठल्याही सदस्यास उमेदवारी, प्रस्तावक किंवा अनुमोदक असण्याची पात्रता राहणार नाही पण त्यांना मताधिकार वापरण्याची पात्रता राहील .

3.6 निवडणूक न्यायाधीकरण कुठली ही थेट तक्रार स्वीकार करणार नाही . निवडणूक अधिकारीच्या कुठल्याही निर्णया विरुद्ध तक्रार ह्या न्यायाधिकरणा समक्ष केली जाऊ शकते.

3.7 निवडणूक न्यायाधिकरण सदस्य आणि निवडणूक अधिकारी यांना निवडणूक कार्या करिता केलेल्या प्रवास दरम्यान मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांना लागू नियमांप्रमाणे प्रवास खर्च, निवास खर्च, भोजन खर्च इत्यादी खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल . पर्यायी व्यवस्थेत ही व्यवस्था मंडळाने केल्यास प्रतिपूर्ती करण्याची आवश्यकता उद्भवणार नाही .

3.8 निवडणूक न्यायाधिकरण सदस्य आणि निवडणूक अधिकारी यांना त्यांच्या सेवे प्रित्यर्थ किती मानधन द्यायचे अथवा द्यायचे नाही हा निर्णय कार्यकारिणी घेईल .

3.9 कुठल्याही तक्रारी च्या अथवा निर्णया संबंधात न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल आणि ह्या निर्णय विरुद्ध कुठल्याही न्यालायात अपील स्वीकार्य नसेल.

3.10 निवडणूक अधिकारीस बृहन्महाराष्ट्र मंडळाचा आजीवन किंवा संरक्षक श्रेणीचा सभासद असणं अनिवार्य आहे . “शुभचिंतक श्रेणी” चे सभासद निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त होण्यास अपात्र असतील .

3.11 निवडणूक अधिकारी ह्यास उमेदवारी, प्रस्तावक किंवा अनुमोदक असण्याची पात्रता राहणार नाही आणि तसंच त्यांना निवडणूक अधिकारी असे पर्यंत मताधिकार वापरण्याची पात्रता पण असणार नाही .

3.12 कुठल्या ही डिजिटल माध्यमांतून (अर्थात ईमेल, व्हॉटसप्प इत्यादी) केलेली तक्रार किंवा उमेदवारातर्फे केलेला पत्र व्यवहार मान्य केला जाणार नाही . सर्व तक्रारी किंवा पत्रव्यवहार हस्तलिखित अथवा टंकलिखित असावे .

3.13 खाली प्रमाणे निकषांना संतुष्ट करणाऱ्या सभासदांना निवडणूक अधिकारी द्वारे मतदात्यास दिलेल्या मतपत्राचा उपयोग करून टपाल द्वारे मतदान करण्याच्या सुविधेचा उपयोग करता येईल:

3.13.1 निवडणूक घोषणा तिथिस किमान 75 वर्ष वय पूर्ण केलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद . अश्या व्यक्तींनी अर्जा सोबत वयाचा कुठलाही सरकारमान्य दाखला प्रस्तुत करावा .

3.13.2 कुठल्याही प्रकारची दिव्यांगते (विकलांगते) नी ग्रस्त असलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद. अश्या व्यक्तींनी अर्जा सोबत दिव्यांगते (विकलांगते) संबंधी डॉक्टर द्वारे सत्यापित कुठलाही सरकारमान्य दाखला, जो जास्तीत जास्त 6 महिने जुना असू शकतो, प्रस्तुत करावा . 6 महिन्या पेक्षा जुना दाखला ग्राह्य धरला जाणार नाही.

3.14 शुभचिंतक सभासद श्रेणी चे सभासद वगळता इतर समस्त सभासद श्रेणींचे सभासद जे निवडणूक घोषणा तिथीस सभासद आहेत आणि ज्यांचे बृहन्महाराष्ट्र मंडळा हितार्थ कुठले ही आर्थिक देणे नाहीये, अशे सभासद मतदाता, उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास पात्र असतील .

3.15 उमेदवारी च्या प्रत्येक अर्जा करिता रुपये शंभर फक्त (रु.100/-) असे उमेदवारी अर्ज शुल्क आकारले जाईल जे भरले असण्याची पावती अर्जा सोबत निवडणूक अधिकाऱ्या कडे प्रस्तुत करावी लागेल. हे उमेदवारी अर्ज शुल्क रुपये शंभर फक्त (रु.100/-) अप्रतिदेय असेल अर्थात कुठल्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही आणी कोणा अन्य उमेदवारा करिता देखील वापरले जाऊ शकणार नाही. पण उमेदवारी करिता कुठली ही अनामत रक्कम घेण्यात येणार नाही .

3.16 निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्या नंतर मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर निवडणुकीशी निगडीत सर्व प्रारूप उपलब्ध केले जातील ज्याचा उपयोग इच्छुक सभासद करू शकतील .

3.17 कोणताही सभासद ज्याला कुठल्याही प्रकारच्या गुन्हेगारी करिता कुठल्याही न्यायालया मार्फत कारावासाची शिक्षा झाली असेल तर असा सभासद निवडणुकीत उमेदवार म्हणून अपात्र असेल.

3.18 निवडणूक अधिकाऱ्या कडे उमेदवारी अर्ज आवश्यक संलग्नकांसह वैयक्तिक रित्या उपस्थित होऊन किंवा टपाल माध्यमांतून किंवा कोणा ही संदेशवाहक मार्फत प्रस्तुत केला जाऊ शकेल . अर्ज प्राप्त झाल्यावर निवडणूक अधिकारी अर्ज प्राप्ती ची पावती देऊ शकेल ज्याच्या वर प्राप्तीची दिनांक आणि वेळ नमूद असेल .

3.19 एक उमेदवाराच्या करिता प्रत्येक पदा करिता अधिकतम तीन उमेदवारी अर्ज भरले जाऊ शकतात अर्थात अधिसूचित कितीही पद ज्याच्या करिता उमेदवार पात्र आहे त्या सर्व पदांकरिता उमेदवाराच्या नांवाचा प्रस्ताव केला जाऊ शकतो. पण प्रत्येक उमेदवारी अर्जात प्रस्तावक आणि अनुमोदक भिन्न भिन्न व्यक्ती असणे बंधनकारक असेल.

3.20 उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी पर्यंत अश्या उमेदवारास फक्त एक पद ठरवून अन्य पदांच्या करिताचे प्रस्ताव मागे घ्यावे लागतील. जर कोणाही उमेदवाराचे नांव उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तिथी उलटल्या नंतर एका पेक्षा जास्त पद करिता शेष असतील तर त्या उमेदवाराचे सर्व पदांकरीताचे प्रस्ताव निरस्त केले जातील. एक उमेदवार तर्फे एका निवडणुकीत फक्त एकाच पदाकरिता आपली उमेदवारी प्रस्तुत केली जाऊ शकते. जर कोणत्याही व्यक्तीची उमेदवारी एका पेक्षा अधिक पदांकरिता प्रस्तावित करण्यात आली तर त्या व्यक्तीचे सर्व उमेदवारी अर्ज अमान्य घोषित करण्यात येतील .

3.21 कुठल्याही सभासदास निवडणूक अधिकारी द्वारा प्रसिद्ध केल्या गेलेल्या मतदाता यादीत त्यांचे नांव असल्यासच उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्याची पात्रता असेल .

3.22 संलग्न संस्थेचे प्रतिनिधि उमेदवार, प्रस्तावक किंवा अनुमोदक होण्यास अपात्र असतील. संस्थागत प्रतिनिधींना फक्त मतदानाचा अधिकार असेल . जर संस्थागत प्रतिनिधी मंडळाचा वैयक्तिक श्रेणीतील पात्र मतदाता असेल तरी ते संस्थागत प्रतिनिधी किंवा वैयक्तिक क्षमतेत एकच मताचे दान करू शकतील ज्याचा निर्णय मतदाताच घेईल. तरी मताचा क्षय न होऊ देण्याच्या दृष्टीनं मंडळाच्या मताधिकार प्राप्त सभासदास संस्थागत प्रतिनिधी न नेमणे हेच इष्ट.

3.23 उमेदवारी अर्जात नमूद माहितीत काही तफावत आढळल्यास निवडणूक अधिकारी संबंधित उमेदवारी अर्ज करणाऱ्या सभासदां कडून स्पष्टीकरण मागवू शकतील . प्राप्त स्पष्टीकरणाच्या आधारावर किंवा उपलब्ध दस्तावेजांच्या आधारावर निवडणूक अधिकारी स्पष्टीकरण न मागवताच सुद्धा स्वतःच्या विवेकानुसार अर्ज स्वीकृत किंवा अस्वीकृत करू शकतील .

3.24 उमेदवारी अर्ज अर्थात नामांकन प्रस्तावांत उमेदवाराच्या सभासद क्रमांक, नांव, निवास पत्त्या संबंधीची आणि अर्जात पुरविलेली अन्य कुठली ही माहिती त्रुटीपूर्ण किंवा चुकीची असल्याचे आढळल्यास उमेदवार, प्रस्तावक, आणि अनुमोदक यांचे सभासदत्व स्वयमेव निरस्त होईल .

3.25 निवडणूक अधिकारी द्वारा निवडणूक वेळापत्रकाच्या प्रमाणे उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा कालावधी व्यतीत / पूर्ण झाल्या पश्चात उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल. ही यादी कार्यकारिणीच्या प्रत्येक पद करिता आणि तसंच प्रत्येक विभागातील विभागीय कार्यवाह या पद करिता असेल .निवडणूक अधिकारी द्वारा ही यादी मतदाता सभासदांच्या सोयी करिता मंडळाच्या अधिकृत संकेत स्थळावर आणि अवधि असल्यास मुखपत्रातून प्रसिद्ध केली जाईल .

3.26 उमेदवारांच्या अंतिम यादीत कुठल्या पदा करिता जर एकाही व्यक्तीचा स्वीकृत अर्ज शेष नसेल तर तशी घोषणा निवडणूक अधिकारी करतील आणि निवडणूक निकालांत पद रिक्त असल्या संबंधीची घोषणा करतील. ह्या रिक्त पदांवर निवडणुकी पश्चात घटना नियमावली च्या तरतुदी अनुसार कार्यकारिणी योग्य निर्णय घेण्यास सक्षम असेल .

3.27 टपाल माध्यम मतदाता यांच्या कडून टपाल माध्यमांतून मतदान करण्यासाठी टपाल खर्च वगळता अन्य कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही . प्रत्येक निवडणूक अधिसूचने आधी कार्यकारिणी सांप्रत टपाल दरांच्या आधारावर घेतला जाणारा टपाल खर्च पण ठरवील ज्याचा उल्लेख टपाल माध्यमांतून मतदानाच्या अधिसूचनेत अनिवार्यत: असेल .

3.28 संस्थागत सभासदांना आपले मत आपल्या कार्यकारिणी च्या सदस्यां मार्फत किंवा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणी सदस्याच्या मार्फत प्रातिनिधिक मत (प्रॉक्सी मत) द्वारे देता येण्याचे दोन विकल्प उपलब्ध असतील . संस्थेला मतदाता यादी प्रमाणे पात्रता असलेल्या मतांच्या संख्ये च्या एवढे प्रतिनिधी पाठविता येतील पण जर संस्था प्रातिनिधिक मत (प्रॉक्सी मत) द्वारे मतदान करणार असेल तर पात्र मतांच्या संख्ये एवढी मतपत्रे त्या अधिकृत व्यक्तीस निवडणूक अधिकारी द्वारे देण्यात येतील .

3.29 बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या विद्यमान कार्यकारिणी सदस्या कडे एका पेक्षा जास्त संस्थांची प्रातिनिधिक मते असू शकतात . पण अश्या एका निर्वाचित सदस्या द्वारे जास्तीत जास्त तीन (3) संस्थांच्या वतीनं प्रातिनिधिक मतदान केले जाऊ शकते. अश्या परिस्थितीत त्या सदस्याकडे उपलब्ध एकूण प्रातिनिधिक मतांच्या संख्ये एवढी मतपत्रे निवडणूक अधिकारी एकाच वेळेस त्या व्यक्तीस निवडणुकी दरम्यान स्वतः देतील आणि तेव्हांच मतदान ही करवून घेतील . अश्या मतदात्यानी वैयक्तिक क्षमतेत मतदान ही ह्याच वेळेस करावे कारण मतदान अधिकारी बोटावर अमित शाई लागलेली असल्यास पुनः मतदानास परवानगी देणार नाहीत .

3.30 मतदाता यादीची सत्यापित प्रत निवडणूक अधिकारी द्वारा निवडणूक स्थळावर निवडणूक पूर्वी किमान एक दिवस आधी माहिती फलकावर लाविली जाईल .

3.31 मतदाना करिता सर्व मतदारांस निवडणूक वेळा पत्रका मध्ये निर्देशित कालावधी प्रमाणे मतदान करण्याची पात्रता असेल . जर ठराविक वेळेत मतदान करण्यास सिद्ध असलेले मतदाता शेष असतील तर अश्या सर्व मतदात्यांनी मतदान करे पर्यंत मतदान अवधी निवडणूक अधिकारी द्वारा वाढविण्यात येईल आणि तशी घोषणा मतदान प्रासादात करण्यात येईल .

3.32 निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध झाल्या नंतर आणि मतदान पश्चात निकाल जाहीर होण्याच्या मधल्या कालावधीत पारदर्शी निवडणूक होण्या करिता तसंच मतदात्यांच्या सुविधे करिता आवश्यक वाटत असलेले अन्य कुठले ही निर्णय, जे ह्या निवडणूक संहितेत समाविष्ट असलेल्या कुठल्या ही नियम अथवा प्रक्रियेच्या विपरीत नसतील, निवडणूक अधिकारी आणि प्रधान कार्यवाह दोघे मिळून घेवू शकतात .

3.33 मंडळ अथवा निवडणूक न्यायाधिकरण अथवा निवडणूक अधिकारी द्वारा केलेल्या कुठल्याही पत्रव्यवहारास टपाल खात्या मुळे विलंब झाला असल्यास त्या करिता कोणास ही झालेल्या कुठल्याही प्रकारच्या हानीस मंडळ अथवा निवडणूक न्यायाधिकरण अथवा निवडणूक अधिकारी जबाबदार धरले जाणार नाही . तरी प्रत्येकाने टपालास लागणारा अवधी लक्षात घेऊनच पत्र व्यवहार करावा .

3.34 उमेदवारांतर्फे मतदात्यांना कुठल्याही प्रकारे प्रलोभन देता येणार नाही . उमेदवारांतर्फे मतदात्यांना धन किंवा पद देणे किंवा भोजनाची व्यवस्था किंवा यात्रेची व्यवस्था इत्यादी करणे उमेदवारांची पात्रता समाप्त करण्यास पुरेशी

असेल . निवडणूक कालावधीत अश्या प्रलोभना संबंधीचा कुठलाही ठोस पुरावा निवडणूक अधिकारी समोर प्रस्तुत केल्यास निवडणूक अधिकारी दोषी उमेदवारांस अपात्र घोषित करू शकतील .

3.35 उमेदवारांतर्फे आपल्या प्रचारा दरम्यान अन्य उमेदवाराच्या व्यक्तिगत जीवनासंबंधी चारित्र्य हनन किंवा चिखलफेक करणे अपेक्षित नाही . असे आढळून आल्यास निवडणूक अधिकारी संबंधित उमेदवारांस समज देतील तरी असला प्रकार चालू राहिल्यास उमेदवारी रद्द करण्या संबंधी निर्णय पण घेऊ शकतील . पण उमेदवारांतर्फे आपल्या प्रचारा दरम्यान अन्य उमेदवाराच्या सार्वजनिक जीवनांत आणि संस्थांमध्ये त्यांच्या कार्या संबंधी टिप्पण्या सभ्यतेच्या कक्षेत केल्या जाऊ शकतात.

3.36 उमेदवारांतर्फे आपल्या प्रचारा दरम्यान जाती आणि धर्म संबंधी कुठलीही टिप्पणी किंवा जाती आणि धर्म ह्या आधारावर मतदान करणे अगर न करणे ह्या संबंधी कुठला ही आग्रह त्या उमेदवाराच्या उमेदवारीस रद्द करण्यास कारणीभूत असेल . ह्या संबंधात प्रमाण आढळून आल्यास निवडणूक अधिकारी उमेदवारी रद्द करण्या संबंधी निर्णय घेऊ शकतील .

3.37 निवडणुकीत कोणाही उमेदवारांस कुठले ही उमेदवारी चिन्ह दिले जाणार नाही . मतपत्रावर पद आणि त्या पदाकरिता उभे असलेले उमेदवार यांचेच नांव असेल . उमेदवाराच्या नांवा समोर मत अंकित करण्या संबंधीचे स्थान असेल . उमेदवारांची संख्या बघून निवडणूक अधिकारी वेगवेगवेगळया पदांकरिता भिन्न भिन्न मतपत्राची योजना पण करू शकतात .

3.38 ह्या निवडणूक संहितेस लागू करण्या साठी मंडळाच्या सर्व साधारण सभेची सामान्य बहुमताची स्वीकृती आवश्यक असेल . ह्या संहितेच्या खंड 4 मध्ये दिलेल्या विविध प्रारूपात जर एकदम गौण परिवर्तन असेल अर्थात ज्या परिवर्तनात कुठली ही अपेक्षित माहिती वगळली जात नसेल अश्या परिवर्तनास कार्यकारिणीच्या स्वीकृतीने लागू करता येईल पण इतरत्र कुठल्याही प्रकारचा बदल करावयाचा असल्यास असा बदल फक्त सर्व साधारण सभेच्या सामान्य बहुमताच्या स्वीकृतीनंच केला जाऊ शकेल .

3.39 निवडणूक प्रक्रियेत उमेदवारांची घोषणा झाल्यानंतर जर कोणी उमेदवार मृत्यू पावला तरी निवडणुका दलीय आधारावर नसून वैयक्तिक पातळीवरच्या असल्या कारणाने निरस्त होणार नाहीत आणि निवडणूक प्रक्रिया निर्बाध रित्या चालू राहील . जर दिवंगत उमेदवारास सर्वाधिक मते प्राप्त झाली तर त्याच्या खालोखाल ज्याला जास्त मते मिळाली असतील त्यास विजयी घोषित कण्यात येईल . जर दिवंगत उमेदवार शिवाय अन्य कोणीच उमेदवार त्या पद करिता नसेल तर अश्या परिस्थितीत ते पद रिक्त घोषित करण्यात येईल .

3.40 कुठल्याही कारणामुळे जर संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत काही विघ्न आले किंवा काही कारणास्तव प्रक्रिया भंग पावली तर निवडणूक अधिकारी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया निरस्त घोषित करतील आणि तत्पश्चात कार्यकारिणीशी सल्ला करून नवीन वेळापत्रका प्रमाणे नवीन अधिसूचना प्रसिद्ध करतील .

3.41 खंड 4 मध्ये नमूद प्रारूपा प्रमाणे मतपत्र छापण्यात येतील . 100 मतपत्रांचे एक पुस्तक बनविले जाईल आणि प्रत्येक मतपत्रावर त्या श्रेणीचा मतपत्र अनुक्रमांक असेल जो एकमेव असेल अर्थात उदाहरणार्थ एकूण 1000 मतपत्र असतील तर अनुक्रमे 1 ते 100, 101 ते 200 , 201 ते 300 , --- , 901 ते 1000 असे अनुक्रम असलेल्या मतपत्रांची 10 पुस्तके असतील . प्रत्येक श्रेणीतील छापलेल्या मतपत्रांची आणि पुस्तकांची संख्या निवडणूक अधिकारी सर्व उमेदवारांच्या सुविधे करिता निवडणूक पूर्वी सकाळी घोषित करतील . शक्यतो प्रत्येक श्रेणीच्या मतपत्रांचा रंग भिन्न ठेवला जाईल .

3.42 कार्यकारिणी पदाधिकारी यांच्या करिता नियत असलेल्या मतपत्रावर प्रारूपाप्रमाणे प्रत्येक पद आणि पात्र उमेदवारांचा तक्ता असावा . निर्विरोध निवडून येणाऱ्या किंवा रिक्त उमेदवारी असलेल्या पदाचा उल्लेख मतपत्रात नसावा . नांवा समोर चौकटीत शिक्का उमटवला जावा . ज्या चौकटीत शिक्क्याचा अधिकांश भाग उमटलेला असेल त्या उमेदवाराकरिता ते मत गणले जाईल आणि ह्या संदर्भात निवडणूक अधिकारी चा निर्णय अंतिम असेल .

मतदाता सत्यापन आणि नोंदणी पत्रकात नोंद झाल्यानंतर छिद्ररेषे वरून मतपत्राचा खालील भाग पृथक करून मतदात्यास मतदाना करिता द्यावा .

3.43 विभागीय कार्यवाह् पदा करिता प्रत्येक विभागा करिता वेगवेगळे मतपत्र असेल . विभागीय कार्यवाह् यांच्या करिता नियत असलेल्या मतपत्रावर प्रारूपाप्रमाणे पात्र उमेदवारांचा तक्ता असावा . निर्विरोध निवडून येणाऱ्या किंवा रिक्त उमेदवारी असलेल्या विभागा करिता मतपत्र छापले जाणार नाही . नांवा समोर चौकटीत शिक्का उमटवला जावा . ज्या चौकटीत शिक्क्याचा अधिकांश भाग उमटलेला असेल त्या उमेदवाराकरिता ते मत गणले जाईल आणि ह्या संदर्भात निवडणूक अधिकारी चा निर्णय अंतिम असेल . मतदाता सत्यापन आणि नोंदणी पत्रकात नोंद झाल्यानंतर छिद्ररेषे वरून मतपत्राचा खालील भाग पृथक करून मतदात्यास मतदाना करिता द्यावा .

3.44 मतदान संपले कि निवडणूक अधिकारी प्रत्येक श्रेणीतील मतपत्राचे वापरले न गेलेले उर्वरित मतपत्र क्रमांक रद्द घोषित करतील आणि असे सर्व मतपत्र वेगळयाने सांभाळून ठेवतील आणि नंतर प्रधान कार्यवाह् यांना रेकॉर्ड सोबत परत करतील .

# खंड 4 : विविध सूचना, अर्ज, आणि अहवाल प्रारूप

## 4.0 अध्याय परिचय

प्रस्तुत अध्यायात विविध प्रकारच्या अधिसूचना, अर्ज, नोंदणीपत्रक, तक्ता, प्रमाणपत्र इत्यादी दस्तावेजांचे अपेक्षित प्रारूप ह्याचा समावेश केला गेला आहे . ह्या प्रारूपांत समाविष्ट माहिती गौण न करता ह्यात कार्यकारिणीच्या अनुमोदनाने परिवर्तन करता येईल . इतर काही परिवर्तन असल्यास सर्वसाधारण सभेची स्वीकृती आवश्यक असेल . येथे समावेश करण्यात आलेल्या विविध प्रारूपांची यादी खालील प्रमाणे आहे :

1. निवडणूक अधिसूचना
2. उमेदवारी अर्ज
3. मतदाता यादी
4. टपाल माध्यमांतून मतदानाची अधिसूचना
5. उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज
6. उमेदवारांची अंतिम यादी
7. उमेदवार तर्फे आपला प्रतिनिधी नेमण्या संबंधी अर्ज
8. संस्था मतदान विकल्प संबंधी सूचना आणि संस्था तर्फे मतदान विकल्प निवड संबंधी सूचना
   अ. संस्था कार्यकारणीतील अधिकृत सदस्य प्रतिनिधी द्वारे
   आ. नामित विद्यमान बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारीणी सदस्यच्या माध्यमांतून प्रातिनिधिक मता द्वारे
9. मतदाता नोंदणी पत्रक
10. मतपत्र
11. मतचिन्ह शिक्का
12. प्राप्त मतांचा तक्ता
13. निर्वाचन प्रमाणपत्र .

# कार्यालय निवडणूक अधिकारी

प्रारूप क्र. 1

(कार्यालयीन पत्ता)

(शहराचे नांव) (दिनांक आणि वार)

## निवडणूक अधिसूचना

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली (संस्था नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत रजिस्ट्रार फर्म्स दिल्ली प्रशासन यांचे कडे नोंदणी क्रमांक 1308/1958-59 वर नोंदणीकृत संस्था) याच्या घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 9ब-1a आणि 9ब-1b च्या अन्वये स्थापित संस्थेच्या कार्यकारिणी च्या विभिन्न पदांकरिता घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 12 च्या अन्वये आदेशित आणि दिनांक 10 जानेवारी 2020 (शुक्रवार) रोजी संस्थेच्या सर्वसाधारणसभे द्वारा स्वीकृत निवडणूक संहितेच्या अनुषंगाने बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली च्या सर्वसाधारणसभे कडून ही अपेक्षा करण्यात येत आहे कि त्यांनी वर उल्लेखित घटना व नियमावलीच्या नियम व उपबंधानुरूप कार्यकारिणीच्या खाली नमूद पदांकरिता ह्या अधिसूचनेत उल्लेखित वेळापत्रका प्रमाणे पात्र सभासद निवडून द्यावे .

### निवडणुकी साठी पद आणि त्याची संख्या

| क्रमांक | पदाचे नांव | पदांची संख्या |
|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | 1 |
| 2 | उपाध्यक्ष | 1 |
| 3 | प्रधान कार्यवाह | 1 |
| 4 | कोषाध्यक्ष | 1 |
| 5 | कार्यवाह | 1 |
| 6 | सहकोषाध्यक्ष | 1 |
| 7 | कार्यवाह (महिला) # | 1 |
| 8 .. 25 | विभागीय कार्यवाह $ | खाली नमूद केल्या प्रमाणे |

**टीप : #** हे पद महिले करिता राखीव असेल **$** राजस्थान, सौराष्ट्र, शेष गुजरात, माळवा, निमाड़, मध्यभारत ,महाकौशल, छत्तीसगढ़ ,पूर्वांचल, उत्तर प्रदेश ,उत्तराखंड, तेलंगाना (आंध्र सहित), कर्णाटक, केरळ ,तामिळनाडु ,गोवा ,राष्ट्रीय राजधानी परिक्षेत्र दिल्ली (नोएडा, गाझियाबाद, फरीदाबाद समवेत) हून प्रत्येकी एक आणि पंजाब, हरियाणा व हिमांचल प्रदेश करिता संयुक्त रूपाने एक अश्या प्रकारे एकूण 18 विभागीय कार्यवाह पदे आहेत

### निवडणुकी साठी वेळा पत्रक

| क्र. | पदाचे नांव | दिनांक व वार | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | उमेदवारी अर्ज प्राप्त करण्याची मुदत | __/__/____ (______वार ) | __:__ वा. पर्यंत |
| 2 | उमेदवारी अर्जांचे सूक्ष्म निरीक्षण | __/__/____ (______वार ) | __:__ वा. पर्यंत |
| 3 | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत | __/__/____ (______वार ) | __:__ वा. पर्यंत |
| 4 | पदानुरूप उमेदवारांची अंतिम यादी घोषणा | __/__/____ (______वार ) | __:__ वा. पर्यंत |
| 5 | मतदान (आवश्यक असल्यास) | __/__/____ (______वार ) | __:__ ते __:__ वा. पर्यंत |
| 6 | मतमोजणी व निकाल | __/__/____ (______वार ) | मतदान समाप्ती नंतर घोषणा |
| 7 | निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची कालमर्यादा # | __/__/____ (______वार ) | __:__ वा. पर्यंत |

*(# ही तिथी सामान्यतः क्र.6 नंतर 15 दिवसांनी असेल)*

(सही व शिक्का)
नांव

प्रतिलिपी :
1. प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणीच्या सूचने करिता )
2. मुखपत्र प्रभारी , (सभासदांना मुखपत्र माध्यामांतून सूचानार्थ)
3. सूचना प्रौद्योगिकी प्रभारी, (सभासदांना इंटरनेट संकेतस्थळ माध्यामांतून सूचानार्थ)

मूल्य : रु.100/-

प्रारूप क्र. 2

# उमेदवारी अर्ज

**(बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी करिता)**

**(ह्या अर्जा मध्ये जे शब्द लागू नसतील ते निरस्त करावे)**

(ह्या अर्जा सोबत प्रस्तावक, अनुमोदक आणि उमेदवार यांनी सरकारमान्य फोटो युक्त परिचयपत्र संलग्न करावे)

## भाग 1
## (प्रस्तावक द्वारे वापरावा)

मी __(प्रस्तावकाचे संपूर्ण नांव)__________ वय __ वर्षे , सभासद क्रमांक _______सभासद श्रेणी __________
विभाग ______(विभागाचे नांव)__________________ मतदाता यादीत माझा मतदार क्रमांक ___________
निवासी _(प्रस्तावकाचा संपूर्ण पत्ता)_____________________________________________

_____________________________________________________________________

एतदद्वारे श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ वय _____ वर्षे , ज्यांचा सभासद क्रमांक _________________सभासद श्रेणी _________________ विभाग _______________________आहे, यांना _________________ पदा करिता उमेदवार म्हणून प्रस्तावित करतो . उमेदवाराचा पत्ता ______________________________________________________________

______________________________________________________________

आहे आणि उमेदवार बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नियमां प्रमाणे निवडणुकीत सहभागी होण्यास पात्र आहे . उमेदवाराचे नांव मतदार यादीत पृष्ठ क्र. _______ वर अनुक्रमांक ________ वर नमूद आहे . उमेदवाराचे छाया चित्र नियत स्थानावर संलग्न आहे .

उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा नवीनतम फोटो येथे चिकटवावा

### घोषणा

मी __(प्रस्तावकाचे संपूर्ण नांव)__________ वय __ वर्षे , सभासद क्रमांक _______सभासद श्रेणी __________
विभाग ______(विभागाचे नांव)__________ एतदद्वारे ही घोषणा करतो कि मी वर दिलेली समस्त माहिती पूर्णपणे सत्य आहे आणि मला हे माहित आहे कि वरील माहितीत काही त्रुटी आढळून आल्यास माझे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदत्व निरस्त होऊ शकते .

स्थळ _________________ (प्रस्तावकाचे नांव व सही)
दिनांक _________________

## भाग 2
## (अनुमोदक द्वारे वापरावा)

मी __(अनुमोदकाचे संपूर्ण नांव)__________ वय __ वर्षे , सभासद क्रमांक _______सभासद श्रेणी __________
विभाग ______(विभागाचे नांव)__________________ मतदाता यादीत माझा मतदार क्रमांक ___________
निवासी _(अनुमोदकाचा संपूर्ण पत्ता)_____________________________________________

_____________________________________________________________________

एतदद्वारे श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ वय _____ वर्षे , ज्यांचा सभासद क्रमांक _________________सभासद श्रेणी _________________ विभाग _______________________आहे, यांच्या वरील प्रमाणे प्रस्तावित उमेदवारीचे अनुमोदन करत आहे . उमेदवार बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या नियमां प्रमाणे निवडणुकीत सहभागी होण्यास पात्र आहे .

### घोषणा

मी __(अनुमोदकाचे संपूर्ण नांव)__________ वय __ वर्षे , सभासद क्रमांक _______सभासद श्रेणी __________
विभाग ______(विभागाचे नांव)__________ एतदद्वारे ही घोषणा करतो कि मी वर दिलेली समस्त माहिती पूर्णपणे सत्य आहे आणि मला हे माहित आहे कि वरील माहितीत काही त्रुटी आढळून आल्यास माझे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदत्व निरस्त होऊ शकते .

स्थळ _________________ (अनुमोदकाचे नांव व सही)
दिनांक _________________

## भाग 3
## (उमेदवार द्वारे वापरावा)

मी __(उमेदवाराचे संपूर्ण नांव)___________ वय __ वर्षे , सभासद क्रमांक _______सभासद श्रेणी __________
विभाग ______(विभागाचे नांव)___________________ मतदाता यादीत माझा मतदार क्रमांक ___________
निवासी _(उमेदवाराचा संपूर्ण पत्ता)_______________________________________________________

_____________________________________________________________________________

एतदद्वारे वरील भाग 1 आणि भाग 2 मध्ये अनुक्रमे प्रस्तावित आणि अनुमोदित _________________ पदा करिता माझ्या उमेदवारीस माझी स्वीकृती देत आहे .

मी घोषणा करत आहे कि :

1. **मी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या घटना व नियमावली आणि निवडणूक संहितेत उल्लेखित समस्त नियमां प्रमाणे उमेदवारीस पात्र आहे.**
2. **मी प्रस्तावित उमेदवारीच्या पदा वर मागील दोन कार्यावधीत लागोपाठ दोन्ही वेळा कार्य केलेले नाही.**
3. मला कुठल्याही प्रकारच्या गुन्ह्या करिता आज पर्यंत कारावासाची शिक्षा झाली नाही .
4. ह्या अर्जात माझ्या बद्दल पुरविलेली सर्व माहिती सत्य आहे .
5. मला स्पष्ट कल्पना आहे कि ह्या अर्जातील माझ्या संबंधी ची कुठलीही माहित असत्य किंवा त्रुटीपूर्ण आढळून आल्यास माझे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे सभासदत्व निरस्त होऊ शकते .

स्थळ _________________

दिनांक ________________ (उमेदवाराचे नांव व सही)

## भाग 4
## (निवडणूक अधिकारी द्वारे वापरावा)

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक _________

श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ यांच्या _____________ पदा किता उमेदवारी अर्ज मला माझ्या कार्यालयात दिनांक ________ वेळ __________ वाजता टपाल माध्यमाने / व्यक्तीगत रीत्या उपस्थित राहून श्री/श्रीमती/सुश्री _______________________ ( उमेदवार / प्रस्तावक / अनुमोदक / संदेशवाहक ) यांचे कडून प्राप्त झाला .

स्थळ _________________

दिनांक ________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

## भाग 5
## (निवडणूक अधिकारी द्वारे सूक्ष्म निरीक्षण पश्चात निर्णय लिहिण्यास वापरावा)

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक _________

मी श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ यांच्या _____________ पदा किता उमेदवारी अर्जाचे सूक्ष्म निरीक्षण केले असून

1. मी पुरविलेल्या समस्त माहिती आणि संलग्न दस्तावेजांशी संतुष्ट आहे आणि उमेदवारी स्वीकृत करत आहे .
2. मी पुरविलेल्या माहिती आणि संलग्न दस्तावेजांशी संतुष्ट नाही आणि उमेदवारी अस्वीकृत करत आहे .
   अस्वीकार करण्याचे कारण ___________________________________________________________
   ______________________________________________________________________________

स्थळ _________________

दिनांक ________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

## भाग 6

**(निवडणूक अधिकारी द्वारे उमेदवारी अर्ज प्राप्ती पावती आणि सूक्ष्म निरीक्षण सूचना म्हणून वापरण्यात यावा )**

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________

श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)_______________ यांच्या ______________ पदा करिता उमेदवारी अर्ज मला माझ्या कार्यालयात दिनांक ________ वेळ ___________ वाजता टपाल माध्यमाने / व्यक्तीगत रीत्या उपस्थित राहून श्री/श्रीमती/सुश्री __________________________ ( उमेदवार / प्रस्तावक / अनुमोदक / संदेशवाहक ) यांचे कडून प्राप्त झाला .
प्राप्त समस्त अर्जांचे सूक्ष्म निरीक्षण दिनांक ___________ वार _______________ वेळ _______________ वाजता
स्थळ ______________________________________________________________________________________
______________________________________________________________________________________________
______________________________________________________________________________________________
______________________________________________________________________________________________

येथे करण्यात येईल . त्या वेळेस आपण उमेदवार किंवा आपले अधिकार पत्र घेऊन येणारे आपले प्रतिनिधी स्वखर्चाने उपस्थित राहू शकतात .

स्थळ ___________________

दिनांक __________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

प्रारूप क्र. 3

## मतदाता यादी
## (व्यक्तिगत श्रेणी)

| विभाग : __________ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मतदाता क्रमांक | सभासद क्रमांक | मतदात्याचे संपूर्ण नांव | स्त्री/पु. | मतदात्याचे वय | मतदात्याचा संपूर्ण पत्ता |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

टीप : प्रत्येक पृष्ठावर वरच्या बाजूस पृष्ठ क्रमांक असावा . विभाग बदलला तरी मतदाता क्रमांक नव्याने प्रारंभ होणार नाही अपितु सतत अनुक्रमांक असेल . यादीचे प्रत्येक पृष्ठावर खाली निवडणूक अधिकारी, प्रधान कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांचे हस्ताक्षर अनिवार्यतः असतील .

## मतदाता यादी
## (संस्थागत श्रेणी)

| विभाग : __________ | | | | |
|---|---|---|---|---|
| मतदाता क्रमांक | संस्था सभासद क्रमांक | संस्थेचे संपूर्ण नांव | संस्थेचा संपूर्ण पत्ता | संस्थेला उपलब्ध मतांची संख्या |
| | | | | |
| | | | | |

टीप : प्रत्येक पृष्ठावर वरच्या बाजूस पृष्ठ क्रमांक असावा . विभाग बदलला तरी मतदाता क्रमांक नव्याने प्रारंभ होणार नाही अपितु सतत अनुक्रमांक असेल . यादीचे प्रत्येक पृष्ठावर खाली निवडणूक अधिकारी, प्रधान कार्यवाह आणि कोषाध्यक्ष यांचे हस्ताक्षर अनिवार्यतः असतील .

प्रारूप क्र. 4

# टपाल माध्यमांतून मतदानाची अधिसूचना

## कार्यालय निवडणूक अधिकारी

(कार्यालयीन पत्ता)

(शहराचे नांव) (दिनांक आणि वार)

**मानीय सभासदांस सूचना**

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली (संस्था नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत रजिस्ट्रार फर्म्स दिल्ली प्रशासन यांचे कडे नोंदणी क्रमांक 1308/1958-59 वर नोंदणीकृत संस्था) याच्या घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 9ब-1a आणि 9ब-1b च्या अन्वये स्थापित संस्थेच्या कार्यकारिणी च्या विभिन्न पदांकरिता घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 12 च्या अन्वये आदेशित आणि दिनांक 10 जानेवारी 2020 (शुक्रवार) रोजी संस्थेच्या सर्वसाधारणसभे द्वारा स्वीकृत निवडणूक संहितेच्या अनुषंगाने निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे .

खाली नमूद केलेल्या निकषांना संतुष्ट करणाऱ्या सभासदांना निवडणूक अधिकारी द्वारे मतदात्यास दिलेल्या मतपत्राचा उपयोग करून टपाल द्वारे मतदान करण्याच्या सुविधेचा उपयोग करता येईल

- निवडणूक घोषणा तिथिस किमान 75 वर्ष वय पूर्ण केलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद
- कुठल्याही प्रकारची दिव्यांगते (विकलांगते) नी ग्रस्त असलेले आजीवन आणि वैयक्तिक संरक्षक श्रेणीतील मताधिकार प्राप्त सभासद

अर्ज पाठविण्याचा पत्ता : ____________________________

निवडणूक अधिकारी

____________________________________________

____________________________________________

____________________________________________

(सही व शिक्का)
नांव
निवडणूक अधिकारी

प्रतिलिपी :
1. प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणीच्या सूचने करिता )
2. मुखपत्र प्रभारी , (सभासदांना मुखपत्र माध्यामांतून सूचानार्थ)
3. सूचना प्रौद्योगिकी प्रभारी, (सभासदांना इंटरनेट संकेतस्थळ माध्यामांतून सूचानार्थ)

## उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज

प्रारूप क्र. 5

### भाग 1
### (उमेदवाराच्या वापरासाठी)

प्रति.

माननीय निवडणूक अधिकारी महोदय
______________________________
______________________________

**विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी निवडणुकीतून उमेदवारी मागे घेण्या संबंधी निवेदन**
**संदर्भ : उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________**

आदरणीय निवडणूक अधिकारी महोदय ,

आपल्या निदर्शनास आणू इच्छितो कि मी ______________________________________ सभासद क्रमांक _________ , मतदाता यादी तील मतदाता क्रमांक __________ सांप्रत अधिसूचित बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी च्या _____________ पदा करिता प्रस्तावित माझ्या उमेदवारीस सहमती प्रदान केली होती . समस्त अर्जांच्या सूक्ष्म निरीक्षणोपरांत माझा उमेदवारी अर्ज आपल्या द्वारे स्वीकृत करण्यात आला होता .

मी आपणांस एतदद्वारे सूचित करू इच्छितो कि आता मी माझी उमेदवारी मागे घेऊ इच्छितो . तरी आपणांस नम्र निवेदन आहे कि कृपया आपण मला माझे उमेदवार म्हणून नांव मागे घेण्यास अनुमती द्यावी . हा अर्ज मी कुठल्याही प्रकाराच्या दबाव किंवा तणाव रहित अवस्थेत स्वेच्छेने वेळापत्रकात नमूद कालावधीत सादर करत आहे . कृपया अर्ज स्वीकृत करावा ही विनंती .

स्थान:
दिनांक: (उमेदवार नांव आणि सही)

### भाग 2
### (निवडणूक अधिकारीच्या वापरासाठी)

उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________

श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ यांच्या ______________ पदा किता उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज मला माझ्या कार्यालयात दिनांक ________ वेळ __________ वाजता टपाल माध्यमाने / व्यक्तीगत रीत्या उपस्थित राहून श्री/श्रीमती/सुश्री _________________________ ( उमेदवार / प्रस्तावक / अनुमोदक / संदेशवाहक ) यांचे कडून प्राप्त झाला . प्राप्त अर्जास मी स्वीकृती देत आहे आणि आता श्री/श्रीमती/सुश्री ______(उमेदवाराचे नांव)______________ यांची उमेदवारी रद्द करण्यात येत आहे .

स्थळ __________________
दिनांक _________________ (निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

# कार्यालय निवडणूक अधिकारी

प्रारूप क्र. 6

(कार्यालयीन पत्ता)

(शहराचे नांव) (दिनांक आणि वार)

## उमेदवारांची अंतिम यादी

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली (संस्था नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत रजिस्ट्रार फर्म्स दिल्ली प्रशासन यांचे कडे नोंदणी क्रमांक 1308/1958-59 वर नोंदणीकृत संस्था) याच्या घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 9ब-1a आणि 9ब-1b च्या अन्वये स्थापित संस्थेच्या कार्यकारिणी च्या विभिन्न पदांकरिता घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 12 च्या अन्वये आदेशित आणि दिनांक 10 जानेवारी 2020 (शुक्रवार) रोजी संस्थेच्या सर्वसाधारणसभे द्वारा स्वीकृत निवडणूक संहितेच्या अनुषंगाने बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली च्या कार्यकारिणीच्या विभिन्न पदांकरिता पात्र उमेदवारांची अंतिम यादी खालील प्रमाणे आहे :

**कार्यकारिणी साठी पदाधिकारी :**

| क्रमांक | पदाचे नांव | | पात्र उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | अध्यक्ष | 1 | |
| | | ... | |
| 2 | उपाध्यक्ष | 1 | |
| | | ... | |
| 3 | प्रधान कार्यवाह | 1 | |
| | | ... | |
| 4 | कोषाध्यक्ष | 1 | |
| | | ... | |
| 5 | कार्यवाह | 1 | |
| | | ... | |
| 6 | सहकोषाध्यक्ष | 1 | |
| | | ... | |
| 7 | कार्यवाह (महिला) | 1 | |
| | | ... | |

**कार्यकारिणी साठी विभागीय कार्यवाह :**

| क्रमांक | विभागाचे नांव | | पात्र उमेदवारांचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | ............... | 1 | |
| | | ... | |
| ...... | ............... | 1 | |
| | | ... | |

स्थळ ___________________

दिनांक _________________

(निवडणूक अधिकारी चे नांव, सही, शिक्का)

प्रारूप क्र. 7

## उमेदवार तर्फे आपला प्रतिनिधी नेमण्या संबंधी अर्ज

प्रति.

माननीय निवडणूक अधिकारी महोदय
______________________________
______________________________

**विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी निवडणुक कार्यात उमेदवार प्रतिनिधीस मान्यता देण्या संबंधी निवेदन**
**संदर्भ : उमेदवारी अर्जाचा अनुक्रमांक __________**

आदरणीय निवडणूक अधिकारी महोदय ,

आपल्या निदर्शनास आणू इच्छितो कि मी ________________________________________ सभासद क्रमांक _________ , मतदाता यादी तील मतदाता क्रमांक __________ सांप्रत अधिसूचित बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी च्या _____________ पदा करिता प्रस्तावित माझ्या उमेदवारीस सहमती प्रदान केली होती . समस्त अर्जांच्या सूक्ष्म निरीक्षणोपरांत माझा उमेदवारी अर्ज आपल्या द्वारे स्वीकृत करण्यात आला होता .

मी आपणांस एतदद्वारे सूचित करू इच्छितो कि खालील नमूद कार्या साठी मी सभासद क्रमांक ___________, असलेले श्री/श्रीमती/सुश्री ________________________________ यांना माझा प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहण्यास अनुमती द्यावी . श्री/श्रीमती/सुश्री ________________________________ यांचे छायाचित्र आणि सही मी खालेल प्रमाणे सत्यापित करीत आहे . यांनी केलेले विधान अथवा प्रतिनिधी म्हणून लेखी दिलेल्या कुठल्याही निवेदनास मी बांधील असेन आणि ह्या संबंधीची सर्व जबाबदारी माझी असेल .

प्रतिनिधीचे छायाचित्र येथे चिकटवावे आणी उमेदवारानी त्यावर सही अश्या प्रकारे करावी कि अंशतः सही छायाचित्रावर आणि उर्वरित सही कागदावर उमटेल

(उमेदवार प्रतिनिधी सही)

स्थान:
दिनांक:

(उमेदवार नांव आणि सही)

प्रारूप क्र. 8

# संस्था मतदान विकल्प संबंधी सूचना

## कार्यालय निवडणूक अधिकारी

(कार्यालयीन पत्ता)

(शहराचे नांव) (दिनांक आणि वार)

**<u>माननीय संस्था सभासदांस सूचना</u>**

बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली (संस्था नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत रजिस्ट्रार फर्म्स दिल्ली प्रशासन यांचे कडे नोंदणी क्रमांक 1308/1958-59 वर नोंदणीकृत संस्था) याच्या घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 9ब-1a आणि 9ब-1b च्या अन्वये स्थापित संस्थेच्या कार्यकारिणी च्या विभिन्न पदांकरिता घटना व नियमावली अंतर्गत कलम संख्या 12 च्या अन्वये आदेशित आणि दिनांक 10 जानेवारी 2020 (शुक्रवार) रोजी संस्थेच्या सर्वसाधारणसभे द्वारा स्वीकृत निवडणूक संहितेच्या अनुषंगाने निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे .

आपल्या निदर्शनास आणू इच्छितो कि ह्या निवडणुकीत आपल्या संस्थेच्या वतीनं खालील नमूद दोन विधींपैकी कुठल्याही एका विधिने मतदान करण्याची सुविधा असेल :

1. आपल्या नियुक्त प्रतिनिधींच्या माध्यमातून, जे अनिवार्य पणे सभासद संस्थेच्या पदाधिकाऱ्यां पैकीच असतील, अर्थात आपल्या कार्यकारिणीतील अधिकृत सदस्य
2. प्रातिनिधिक मताच्या (प्रॉक्सी मत) माध्यमातून ज्याच्या अंतर्गत आपली संस्था बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कुठल्याही विद्यमान निर्वाचित कार्यकारिणी सदस्याच्या माध्यमातून मतदान करू शकेल .

वरील दोन्ही विधी अंतर्गत संलग्न परिपत्रावरच आपली मतदान विधीची निवड आणि अन्य अपेक्षित माहिती निवडणूक कार्यक्रमानुसार अधोहस्ताक्षरकर्त्या पर्यंत पोहोचवावी लागेल. आपल्या संस्थेस पात्र मतांची संख्या मतदाता यादीत नमूद आहे . तरी आपणांस आग्रह आहे कि आपण वरील पैकी आपणांस सोयीस्कर पद्धतीनं मतदान अवश्य करावे . आपली मतदान विधीची निवड आणि विकल्प क्र.1 अथवा विकल्प क्र. 2 संबंधीचे संलग्न विकल्प निवड पत्र दिनांक __/__/____ पर्यंतच्या कालमर्यादे पर्यंत टपाल माध्यमांतून खाली नमूद पत्त्यावर प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी किंवा ह्या तारखे नंतर निवडणूक स्थळावर माझ्या समक्ष मतदानांस अधिकृत प्रतिनिधीच्या माध्यमांतून प्रस्तुत करावे .

अर्ज पाठविण्याचा पत्ता : ____________________________

निवडणूक अधिकारी

__________________________________________

__________________________________________

__________________________________________

(सही व शिक्का)
नांव
निवडणूक अधिकारी

संलग्न : वरील प्रमाणे

प्रतिलिपी : प्रधान कार्यवाह , (कार्यकारीणीच्या सूचने करिता )

प्रारूप क्र. 8अ

# संस्था तर्फे मतदान विकल्प निवड संबंधी सूचना
## (संस्था कार्यकारणीतील अधिकृत सदस्य प्रतिनिधी द्वारे )

प्रति,

माननीय निवडणूक अधिकारी महोदय

________________________________________

________________________________________

**विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी साठी निवडणुकीत मतदान पद्धती विकल्पाची निवड**

आपणांस कळविण्यात येत आहे कि आमच्या संस्थेने सदर निवडणुकीत मतदान पद्धती विकल्प क्रमांक 1 अर्थात आपल्या कार्यकारीणीतील सदस्यांच्या माध्यमांतून मतदान करण्याचे ठरविले आहे . आमच्या संस्थेची अपेक्षित माहिती आणि पात्र मतांच्या संख्ये प्रमाणे अधिकृत मतदात्यांचा परिचय खाली प्रस्तुत आहे . कृपया यांना मतदान करण्याची अनुमती द्यावी .

| | | | |
|---|---|---|---|
| संलग्न संस्थेचे नांव | | | |
| संस्थेचा नोंदणी चे स्थळ, क्रमांक, व दिनांक | | | |
| बृहन्महाराष्ट्र मंडळाचा सभासद क्रमांक | IPM | संलग्नता दिनांक: | |
| संस्थेच्या संपर्क पदाधिकारीचे संपूर्ण नांव | | | |
| संस्थेचा संपूर्ण पत्ता | | | |
| शहर | | विभाग | पिन कोड |
| मोबाईल | | ईमेल | |

| | | |
|---|---|---|
| **प्रतिनिधी क्र. 1** नांव | आधार क्रमांक | |
| संपूर्ण पत्ता | | |
| शहर | विभाग | पिन |
| मोबाईल क्रमांक | हस्ताक्षर प्रतिनिधी क्र. 1 | |
| **प्रतिनिधी क्र. 2** नांव | आधार क्रमांक | |
| संपूर्ण पत्ता | | |
| शहर | विभाग | पिन |
| मोबाईल क्रमांक | हस्ताक्षर प्रतिनिधी क्र. 2 | |
| **प्रतिनिधी क्र. 3** नांव | आधार क्रमांक | |
| संपूर्ण पत्ता | | |
| शहर | विभाग | पिन |
| मोबाईल क्रमांक | हस्ताक्षर प्रतिनिधी क्र. 3 | |

| | |
|---|---|
| सही व शिक्का<br>अध्यक्ष (संलग्न संस्था) | सही व शिक्का<br>सचिव (संलग्न संस्था) |

प्रारूप क्र. 8ब

# संस्था तर्फे मतदान विकल्प निवड संबंधी सूचना
## (नामित विद्यमान बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारीणी सदस्यच्या माध्यमांतून प्रातिनिधिक मता द्वारे)

प्रति,

माननीय निवडणूक अधिकारी महोदय

_______________________________

_______________________________

**विषय : बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी साठी निवडणुकीत मतदान पद्धती विकल्पाची निवड**

आपणांस कळविण्यात येत आहे कि आमच्या संस्थेने सदर निवडणुकीत मतदान पद्धती विकल्प क्रमांक 2 प्रातिनिधिक मताच्या (प्रॉक्सी मत) अर्थात नामित विद्यमान बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारीणीतील सदस्यच्या माध्यमांतून मतदान करण्याचे ठरविले आहे . आमच्या संस्थेची अपेक्षित माहिती आणि नामित बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी सदस्याची माहिती खालील प्रमाणे आहे . कृपया यांना आमच्या संस्थेच्या वतीनं मतदान करण्याची अनुमती द्यावी .

| | | | |
|---|---|---|---|
| संलग्न संस्थेचे नांव | | | |
| संस्थेचा नोंदणी चे स्थळ, क्रमांक, व दिनांक | | | |
| बृहन्महाराष्ट्र मंडळाचा सभासद क्रमांक | IPM | संलग्नता दिनांक: | |
| संस्थेच्या संपर्क पदाधिकारीचे संपूर्ण नांव | | | |
| संस्थेचा संपूर्ण पत्ता | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शहर | | विभाग | | पिन कोड | |
| मोबाईल | | ईमेल | | | |

| | |
|---|---|
| प्रातिनिधीक मत देण्यास अधिकृत बृहन्महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी सदस्याचे नांव | श्री / श्रीमती / सुश्री |
| नामित कार्यकारीणी सदस्याचे पद | |
| नामित कार्यकारीणी सदस्याचा विभाग | |

सही व शिक्का

अध्यक्ष (संलग्न संस्था)

सही व शिक्का

सचिव (संलग्न संस्था)

प्रारूप क्र. 9

# मतदाता नोंदणी पत्रक
## (व्यक्तिगत श्रेणी)

| क्रमांक | मतदाता क्रमांक | सभासद क्रमांक | मतदात्याचे संपूर्ण नांव | स्त्री/पु. | विभाग | मतदाता हस्ताक्षर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

टीप : प्रत्येक पृष्ठावर वरच्या बाजूस पृष्ठ क्रमांक असावा . विभाग बदलला तरी मतदान क्रमांक सतत अनुक्रमांक असेल . यादीचे प्रत्येक पृष्ठावर खाली मतदान अधिकारी / निवडणूक अधिकारी यांचे हस्ताक्षर अनिवार्यतः असतील .

# मतदाता नोंदणी पत्रक
## (संस्थागत श्रेणी)

| क्रमांक | मतदाता क्रमांक | IPM सभासद क्रमांक | संस्थेचे संपूर्ण नांव | प्रतिनिधीचे नांव | स्त्री/पु. | विभाग | मतदाता हस्ताक्षर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

टीप : प्रत्येक पृष्ठावर वरच्या बाजूस पृष्ठ क्रमांक असावा . विभाग बदलला तरी मतदान क्रमांक सतत अनुक्रमांक असेल . यादीचे प्रत्येक पृष्ठावर खाली मतदान अधिकारी / निवडणूक अधिकारी यांचे हस्ताक्षर अनिवार्यतः असतील .

प्रारूप क्र. 10

# मतपत्र (कार्यकारिणी पदाधिकारी)

मतपत्र अनुक्रमांक : XXXX

विभागाचे नांव : ____________________ मतदान अधिकारी ची सही व शिक्का

(छिद्ररेषा perforation)

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मतपत्र अनुक्रमांक : XXXX मतदान अधिकारी ची सही व शिक्का

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | … … … … … … | |
| | … … … … … … | |
| **उपाध्यक्ष** | … … … … … … | |
| | | |
| | … … … … … … | |
| | … … … … … … | |
| **प्रधान कार्यवाह** | | |
| | | |
| | … … … … … … | |
| | … … … … … … | |

ह्या प्रमाणे प्रत्येक पद आणि पात्र उमेदवारांचा तक्ता असावा . निर्विरोध निवडून येणाऱ्या किंवा रिक्त उमेदवारी असलेल्या पदाचा उल्लेख मतपत्रात नसावा . नांवा समोर चौकटीत शिक्का उमटवला जावा . ज्या चौकटीत शिक्क्याचा अधिकांश भाग उमटलेला असेल त्या उमेदवाराकरिता ते मत गणले जाईल आणि ह्या संदर्भात निवडणूक अधिकारी चा निर्णय अंतिम असेल . मतदाता सत्यापन आणि नोंदणी पत्रकात नोंद झाल्यानंतर छिद्ररेषे वरून मतपत्राचा खालील भाग पृथक करून मतदात्यास मतदाना करिता द्यावा .

# मतपत्र (विभागीय कार्यवाह)

मतपत्र अनुक्रमांक : XXXX

विभागाचे नांव : ____________________ मतदान अधिकारी ची सही व शिक्का

(छिद्ररेषा perforation)

मतपत्र अनुक्रमांक : XXXX मतदान अधिकारी ची सही व शिक्का

| (विभागाचे नांव) | |
|---|---|
| … … … … … … | |
| … … … … … … | |

ह्या प्रमाणे प्रत्येक विभागा करिता वेगवेगळे मतपत्र असेल . मतपत्रावर पात्र उमेदवारांचा तक्ता असावा . निर्विरोध निवडून येणाऱ्या किंवा रिक्त उमेदवारी असलेल्या विभागा करिता मतपत्र छापले जाणार नाही . नांवा समोर चौकटीत शिक्का उमटवला जावा . ज्या चौकटीत शिक्क्याचा अधिकांश भाग उमटलेला असेल त्या उमेदवाराकरिता ते मत गणले जाईल आणि ह्या संदर्भात निवडणूक अधिकारी चा निर्णय अंतिम असेल . मतदाता सत्यापन आणि नोंदणी पत्रकात नोंद झाल्यानंतर छिद्ररेषे वरून मतपत्राचा खालील भाग पृथक करून मतदात्यास मतदाना करिता द्यावा .

प्रारूप क्र. 11

# मतचिन्ह शिक्का



प्रारूप क्र. 12

# प्राप्त मतांचा तक्ता

## मत मोजणी फेरी क्रमांक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **अध्यक्ष** | 1 | … … … … … … | 1+1+1+…… | बेरीज |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | … | … … … … … … | 1+1+1+…… | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

टीप: उमेदवारांची संख्या आणि कागदावर उपलब्ध जागा ह्या आधारे तक्त्यावर विभिन्न पदे समाविष्ट करावी . प्रत्येक फेरी करिता वेगळा तक्ता वापरावा . प्राप्त मत 1+1+ ऐवजी अन्य कुठल्याही पद्धतीनं अंकित करण्याची मुभा निवडणूक अधिकारी यांना असेल पण आत एवढीच कि प्रत्येक मताची नोंद झाली पाहिजे .

प्रारूप क्र. 13

# निर्वाचन प्रमाणपत्र

## बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली

### निर्वाचन प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येत आहे कि श्री/श्रीमती/सुश्री ______________________________ ज्यांचा सभासद क्रमांक ___________ आहे , ह्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली च्या कार्यकारिणीतील _________________ ह्या पदा करिता दिनांक _________ रोजी संपन्न निवडणुकीत निर्विरोध / ______ मतांपैकी ______, (प्राप्त मतांची संख्या आकड्यात आणि अक्षरी ) _____ मते मिळवून निर्वाचित झाले .

हे प्रमाणपत्र आज दिनांक ______________ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रदान करण्यात आले .

**दिनांक** **(निवडणूक अधिकारी)**

**स्थळ** **सही , शिक्का, व नांव**